रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ८१
www.ramprahar.com

◆ गुरुवार, ८ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

आरोग्य क्षेत्रासाठी राज्यस्तरीय लिव्हिंग लॅब/२
महिलेचा वेश धारण करून हत्या; आरोपीला जन्मठेप/५
'सीकेटी'च्या निकिताला बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक/८

## जनतेचा विश्वास हीच माझी ताकद -पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी (दि. ७) सार्वजनिक प्रशासनातील २५ वर्षे पूर्ण केली. यानिमित्ताने दिल्लीत एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, जिथे पंतप्रधान मोदींनी देशभरातील भाजप कार्यकर्त्यांना व्हर्च्युअल माध्यमातून संबोधित केले. सरकारचे प्रमुख म्हणून देशाची सेवा करीत असताना आज २५ वर्षे पूर्ण झाली आहेत, असे सांगून त्यांनी या यशाचे श्रेय जनतेच्या अखंड आशीर्वादाला दिले तसेच भाजप, एनडीए आणि लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांचे आभार मानले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले की, त्यांच्यासाठी जनता हेच ईश्वराचे रूप आहे. लाखो लोकांचा विश्वास हीच आपली शक्ती असल्याचे त्यांनी नमूद केले. देशाने आपल्यासाठी खूप काही दिले आहे. त्यामुळे देश हेच त्यांच्यासाठी सर्वस्व आहे. देशातील नागरिकांचाच आपल्यावर सर्वांत मोठा अधिकार आहे, असेही त्यांनी सांगितले.

### गौरव कर्तृत्वाचा, बहुमान समाजसेवेचा!

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा शरदरत्न जीवनगौरव पुरस्काराने यथोचित सन्मान

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

समाजाच्या सुख-दुःखात सहभागी होणारे आणि कोणताही अभिनिवेश न ठेवता सर्वसामान्यांमध्ये मिसळून राहणारे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सहा दशकांहून अधिक काळाच्या संघर्षमय, कर्तृत्ववान आणि सेवाभावी जीवनप्रवासाचा प्रतिष्ठेच्या शरदरत्न जीवनगौरव पुरस्काराने बुधवारी (दि. ७) सन्मान करण्यात आला. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार शरद पवार यांच्या हस्ते आणि प्रतिभाताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच हजारो नागरिकांच्या साक्षीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान, महाराष्ट्र यांच्या वतीने मुंबईतील रवींद्र नाट्यमंदिर येथे पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक आणि सार्वजनिक जीवनात दिलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत गोरगरिबांचे आधारस्तंभ, गरजूंच्या मदतीला धावून जाणारे दानशूर व्यक्तिमत्त्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा शरदरत्न जीवनगौरव पुरस्काराने यथोचित गौरव करण्यात आला.

या सोहळ्यास रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, कामगार नेते महेंद्र घरत, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेलचे महापौर नितीन पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, नगरसेवक परेश ठाकूर, सुमित झुंजारराव, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, अमोघ ठाकूर, पूनम ठाकूर, रत्नप्रभा घरत यांच्यासह ठाकूर कुटुंबीय, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी शहराध्यक्ष जयंत पगडे, शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजारामबुवा शेलार, उपाध्यक्ष भावना घाणेकर, विविध संस्थांचे पदाधिकारी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख त्यांच्या पदांपेक्षा माणसांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यात आहे. मोठेपणाची कोणतीही औपचारिकता न ठेवता सर्वसामान्य माणसांमध्ये सहजपणे मिसळणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि शक्य ते सहकार्य करण्यासाठी तत्पर राहणे ही त्यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये राहिली आहेत. गरिबांच्या घरातील अडचण असो, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न असो, एखाद्या कुटुंबावर आलेले संकट असो किंवा तरुणांच्या भविष्याचा प्रश्न असो; मदतीची गरज असलेल्या व्यक्तीपर्यंत पोहचण्याची त्यांची भूमिका सातत्याने राहिली आहे. त्यामुळेच अनेक गरजू कुटुंबांसाठी ते आधारवड, तर असंख्य विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची आशा ठरले आहेत. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहचला पाहिजे, ही भावना त्यांच्या समाजकार्याच्या केंद्रस्थानी राहिली. त्याचप्रमाणे प्रसिद्धी किंवा प्रसिद्धीचा गाजावाजा करण्यापेक्षा प्रत्यक्ष मदत आणि सामाजिक दायित्वाला त्यांनी महत्त्व दिले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जीवनप्रवास हा संघर्षातून उभ्या राहिलेल्या कर्तृत्वाची प्रेरणादायी कहाणी आहे. अत्यंत सामान्य परिस्थितीतून पुढे येत त्यांनी व्यवसाय, समाजकारण, शिक्षण आणि राजकारण या विविध क्षेत्रांत आपले स्थान निर्माण केले. शिक्षकाची नोकरी करीत असताना सिडकोचे १० हजार रुपयांचे पहिले काम मिळाले. हे काम स्वीकारण्यासाठी घरातील दागिने गहाण ठेवण्याबरोबरच पैसे उधार घेण्याची वेळ आली, मात्र संकटाला न घाबरता त्यांनी संधीचे कर्तृत्वात रूपांतर केले. कष्ट, प्रामाणिकपणा आणि जिद्दीच्या जोरावर हे काम यशस्वी करीत त्यांनी व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली. १० हजार रुपयांपासून सुरू झालेला प्रवास पुढे मोठ्या प्रकल्पांपर्यंत पोहचला, परंतु आर्थिक यश मिळाल्यानंतरही त्यांच्या पायाखालची माती आणि माणसांशी असलेली नाळ कधी तुटली नाही.

छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिसूर्य महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, प्रकल्पग्रस्तांचे नेते दि.बा. पाटील आणि थोर समाजसुधारक जनार्दन भगत यांना आदर्शस्थानी ठेवून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या कार्याची वाटचाल केली. **(पान २ वर..)**




### 'रयत'च्या वाटचालीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे मोलाचे योगदान -खासदार शरद पवार

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरू केलेल्या शिक्षण चळवळीमुळे महाराष्ट्रातील सर्वसामान्य समाज शिक्षित झाला. या महान शिक्षण परंपरेतूनच लोकनेते रामशेठ ठाकूर घडले आहेत. आज ते उद्योजक म्हणून ओळखले जात असले, तरी त्यांची खरी ओळख ही कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'कमवा आणि शिका' योजनेतून घडलेला विद्यार्थी अशी आहे, असे गौरवोद्‌गार माजी केंद्रीय मंत्री तथा विद्यमान खासदार शरद पवार यांनी सत्कार सोहळ्यात काढले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दिलेला जनसेवेचा आणि शिक्षणसेवेचा वारसा लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जपला आहे. रयत शिक्षण संस्थेला त्यांचे आशीर्वाद आणि भक्कम पाठबळ सातत्याने लाभत आले आहे. रयत शिक्षण संस्था आज यशस्वीपणे उभी राहण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. संस्थेच्या पुढील वाटचालीतही त्यांची ताकद आणि सहकार्य अखंडपणे पाठीशी राहील, अशी अपेक्षा आहे, असे सांगून शिक्षण हे केवळ व्यक्तीच्या प्रगतीचे साधन नसून समाजाच्या विकासाचे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी रामशेठ ठाकूर यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. कर्मवीरांच्या विचारांची प्रेरणा घेऊन त्यांनी शिक्षण, समाजसेवा आणि जनकल्याणाच्या क्षेत्रात केलेले कार्य ही सामाजिक बांधिलकीची जपणूक करणारी परंपरा आहे, असेही खासदार शरद पवार यांनी नमूद केले.

# श्री बल्लाळेश्वराच्या भूमीत भाजपची सेवा ज्योती यात्रा

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याचा गौरव

**पाली : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक सेवेतील ऐतिहासिक प्रवासाला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात सेवा संकल्प अभियान राबवले जात आहे. याच अभियानाचा एक भाग म्हणून पाली येथील श्री क्षेत्र बल्लाळेश्वराच्या पवित्र भूमीत बुधवारी (दि.७) सेवा ज्योती यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

७ ऑक्टोबर २००१ रोजी नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून पहिल्यांदा शपथ घेतली होती. तेथून सुरू झालेला हा सेवाप्रवास पुढील काळात २०१४पासून देशाचे पंतप्रधान म्हणून अविरतपणे सुरू आहे. या २५ वर्षांच्या कालावधीत त्यांनी जनसेवा आणि राष्ट्रविकासाच्या भावनेला प्राधान्य दिले. २५ वर्षांचा हा सेवाप्रवास पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सेवा संकल्प अभियानांतर्गत सेवा ज्योती यात्रा काढण्यात आली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संबोधन व्हिडीओ स्क्रिनच्या माध्यमातून दाखविण्यात आले.

या उपक्रमादरम्यान बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताने जागतिक स्तरावर एक नवी ओळख निर्माण केली आहे. गुजरात राज्याचा कायापालट करण्यापासून ते देशातील कोट्यवधी गरिबांना दारिद्र्यरेषेच्या वर आणणे, मेक इन इंडिया उपक्रम, अंतराळ क्षेत्रातील चांद्रयान मोहीम यांसारख्या मोठ्या घोडदौडी आणि कोरोना काळात १०० कोटींहून अधिक लसीकरणाचा टप्पा पूर्ण करणे या सर्व ऐतिहासिक कामगिरींचा यात समावेश आहे.

भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा माजी खासदार धैर्यशील पाटील यांनी सरकार नेहमीच जनतेला अधिक चांगले आणि पारदर्शक प्रशासन देण्यासाठी कटिबद्ध आहे, असे सांगितले. या उपक्रमाबद्दल महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष चित्रा पाटील यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश प्रगतिपथावर जात असल्याचे म्हटले.



सेवा ज्योती यात्रेत अभियान प्रमुख तथा जिल्हा परिषद सभापती वैकुंठ पाटील, भाजप नेते प्रकाश देसाई, गीता पालरेचा, आलाप मेहता, पंचायत समिती सभापती जागृती मानकर, सुधागड तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, महिला मोर्चा अध्यक्ष प्रणाली शेठ, नगराध्यक्ष पराग मेहता, अमित घाग, जि.प. सदस्य चंद्रकांत वारगुडा तसेच दादा घोसाळकर, शर्मिला पाटील, अरिफ मनियार, सुजित बारसकर, शरद चोरगे, विठ्ठल सिंदकर, रोहन दगडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यानंतर विकसित भारत संकल्प सभा झाली.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या २५ वर्षांच्या सेवाप्रवासाच्या निमित्ताने आयोजित उपक्रमात अर्चना शेडगे हिने विकसित भारत दर्शविणारी भव्य रांगोळी काढली. त्याबद्दल तिला मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

## एमपीएससी आंदोलन आता राजकीय झाले : मुख्यमंत्री

**नवी दिल्ली :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांबाबत विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला आता राजकीय स्वरूप आले असून मूळ मागण्यांपेक्षा विविध राजकीय विषयांवर भाषणे केली जात आहेत, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.७) व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या आडून राजकारण केले जात असून एमपीएससीच्या प्रश्नांवर सरकारने विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा करून त्यांच्या मागण्यांवर निर्णय घेतल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

नवी दिल्ली येथे माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी एमपीएससीच्या आंदोलनाबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी या विषयावर कोणतीही चर्चा झालेली नसल्याचे त्यांनी सांगितले. आंदोलनाच्या ठिकाणी एमपीएससीच्या विषयांऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदी, देशातील राजकीय परिस्थिती आदी विषयांवर भाषणे होत असल्याचा दावा त्यांनी केला, मात्र आंदोलनात काही विद्यार्थीही सहभागी असल्याने पोलिसांनी संयमाने परिस्थिती हाताळल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

# महिला शेतकरी प्रमाणपत्र योजनेला प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण कायदा २०२६ अंतर्गत प्रत्यक्ष शेतीची कामे करणाऱ्या महिलांना शेतकरी प्रमाणपत्र देण्याची महत्त्वपूर्ण योजना राज्य शासनाने सुरू केली आहे. याद्वारे जमिनीची मालकी नसलेल्या महिलांनाही अधिकृत शेतकरी ओळख व शासकीय योजनांचा लाभ मिळणे सोपे झाले आहे. या योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील ५६ हजार १०५ महिला शेतकऱ्यांचे अर्ज आतापर्यंत प्राप्त झाले आहेत.

सध्याच्या काळात शेती, पशुपालन, दुग्धव्यवसाय, बीजसंवर्धन, भाजीपाला उत्पादन, शेतमालाची प्रक्रिया अशा जवळपास प्रत्येक टप्प्यावर महिला

### रायगडात ५६ हजार अर्ज

वर्षानुवर्षे पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आल्या आहेत. तरीही "शेतकरी" ही ओळख मात्र बहुतेक वेळा जमिनीच्या सातबाऱ्यावर नाव असलेल्या व्यक्तीपुरतीच मर्यादित राहिली. त्यामुळे शेती करणाऱ्या लाखो महिला पीककर्ज, पीक विमा, कृषी अनुदान आणि इतर अनेक शासकीय योजनांपासून वंचित राहत होत्या. या पार्श्वभूमीवर शासनाने महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण कायदा २०२६ लागू केला आहे.

ज्या महिलांनी अद्याप अर्ज केला नसेल त्यांनी कृषी विभागाकडे संपर्क साधावा. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतींनीही विशेष ग्रामसभा घेऊन प्राप्त अर्जांची योग्य पडताळणी करून मंजुरी द्यावी, असे आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

> **महिला या शेती, पशुपालन, दुग्धव्यवसायातही अग्रेसर आहेत. त्यामुळे त्यांना 'शेतकरी' म्हणून ओळख मिळावी यासाठी शासनातर्फे महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. जास्तीत जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा.**
> **-वैकुंठ पाटील,** कृषी सभापती, रायगड जिल्हा परिषद

## कार अपघातात एक ठार, सहा जण जखमी

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर वहूर गाव हद्दीत बुधवारी (दि. ७) सकाळी १०च्या सुमारास भरधाव ईर्टिगा कार केबलचे काम करीत असलेल्या कामगारांना धडकून बाजूला शेतात उलटली. यात कारचालक ठार झाला असून चार प्रवासी तसेच दोन कामगार असे एकूण सहा जण जखमी झाले आहेत.

मृतांमध्ये चालक जमील शेख याचा समावेश आहे, तर कारमधील आरिफ रईस खान, संतोष सुधाकर पाटील, मोहम्मद आसिफ मोहम्मद हुसेन चौधरी, मोहम्मद रफीक युसूफ झवेरी हे प्रवासी तसेच कामगार सुनील मंगलसिंग पंधराम, खुन्नू बलहारी सेलू गंभीर जखमी झाले. सर्व जखमींवर महाड ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. महाड शहर ठाण्यात अपघाताची नोंद झाली असून पुढील तपास सुरू आहे.



**पनवेल** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक सेवेतील ऐतिहासिक २५ वर्षांच्या प्रवासाचे औचित्य साधून भाजपच्या वतीने देशभरात सेवा संकल्प अभियान राबविले जात आहे. या अभियानांतर्गत उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने पनवेल येथील विरूपाक्ष मंगल कार्यालयात विकसित भारत संकल्प सभा-सेवा ज्योती पदयात्रा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील कर्जतकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे उरणचे आमदार महेश बालदी, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, महापौर नितीन पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, पंचायत समिती सभापती रंजना वास्कर, सभापती कृष्णा पारंगे, जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# आरोग्य क्षेत्रासाठी राज्यस्तरीय लिव्हिंग लॅब; मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून आरोग्य नवोन्मेष उपक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सर्वांसाठी आरोग्य या ध्येयाला पूरक ठरणारी आरोग्य नवोन्मेष आणि गुणवत्ता सुधारणेसाठीची राज्यस्तरीय लिव्हिंग लॅब विकसित होत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून आरोग्य सुविधांचा दर्जा आणि गुणवत्ता मानकांचे पालन सुधारण्यासह राज्यातील नागरिकांसाठी कौशल्य विकास व रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. स्थानिक आरोग्यविषयक प्राधान्यक्रम निश्चित करणे, समुदायांसोबत उद्देशानुरूप उपाय तयार करणे आणि प्रत्यक्ष आरोग्य व्यवस्थेत नव्या पद्धतींची चाचणी घेणे, हा या व्यासपीठाचा उद्देश आहे.




शासन, आरोग्यसेवा प्रदाते, खासगी क्षेत्र, शैक्षणिक संस्था, नवोन्मेषक आणि विकास भागीदारांचे अनुभव व क्षमता एका सामायिक व्यासपीठावर आणून सध्याची आरोग्य व्यवस्था आणि उपचार मार्ग अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न लिव्हिंग लॅबच्या माध्यमातून करण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा प्रयत्न आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल आरोग्य, डेटा आणि प्रिसिजन हेल्थसह नवोन्मेष व तंत्रज्ञानाच्या क्षमतांचाही यासाठी उपयोग केला जाणार आहे. खासगी आरोग्य क्षेत्राची व्याप्ती व क्षमता सार्वजनिक आरोग्याच्या प्राधान्यक्रमांशी जोडणे, ही या उपक्रमातील महत्त्वाची संधी आहे. विविध भागधारकांच्या सहभागातून स्थानिक गरजांना प्रतिसाद देणारे व्यवहार्य, परवडणारे आणि सुलभ उपाय विकसित करता येतील. यशस्वी उपायांचा महाराष्ट्रासह अन्य ठिकाणीही विस्तार करण्याची क्षमता तपासली जाईल.

उपक्रमाच्या पुढील टप्प्यांत समुदायाच्या आरोग्यविषयक गरजांशी निगडित स्थानिक कौशल्यविकास, रोजगार आणि उद्योगनिर्मितीच्या संधींचाही शोध घेतला जाणार आहे. केवळ नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याऐवजी दुर्गम व आरोग्यसेवेपासून वंचित घटकांसह प्रत्येक नागरिकापर्यंत नवोन्मेष पोहोचविण्यावर या संकल्पनेत भर आहे. शासन, समुदाय, नवोन्मेषक आणि भागीदारांच्या सहभागातून परिणामकारक उपायांची चाचणी, त्यातून मिळणाऱ्या अनुभवांचे वेगाने विश्लेषण आणि आरोग्यसेवेची गुणवत्ता व समानता सुधारणाऱ्या उपायांचा व्यापक विस्तार करण्याचे उद्दिष्ट आहे.पुरावेनिर्मिती आणि सहकार्याचे व्यासपीठ म्हणून लिव्हिंग लॅब विकसित केली जाणार आहे.

समुदायाच्या गरजा आणि स्थानिक मालकी या प्रक्रियेच्या केंद्रस्थानी ठेवून नवोन्मेष, आरोग्य व्यवस्था आणि प्रत्यक्ष सेवा देणाऱ्या घटकांमधील समन्वय अधिक मजबूत केला जाईल.द फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडियाचा मान्यता हा प्रमुख उपक्रम या दृष्टिकोनाचे प्रारंभिक उदाहरण आहे. मातृ आरोग्यसेवा बळकट करण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना पूरक असलेल्या या उपक्रमातून खासगी क्षेत्रातील गुणवत्ता सुधारणा प्रारूप सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसोबत कशा प्रकारे कार्य करू शकते, हे दिसून येते. एमएसडी फॉर मदर्स या उपक्रमाचा समन्वय करीत असून, या सहयोगी प्रारूपाच्या विकासासाठी विविध भागीदारांचा समूह एकत्र आणत आहे.

## बोंडशेतच्या सुपुत्राची सेमीकंडक्टर प्रकल्पात निवड

**माणगाव : बातमीदार**

निजामपूर विभागातील बोंडशेत मानकरवाडी गावचे सुपुत्र सागर साहेबराव जाधव यांनी आपल्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवासात उल्लेखनीय यश संपादन केले असून तब्बल १५ वर्षांच्या अनुभवाच्या जोरावर त्यांची टाटा इलेक्ट्रॉनिक्स कंपनीमध्ये निवड झाली आहे. गुजरातमधील धोलेरा येथे उभारण्यात येत असलेल्या सेमीकंडक्टर फॅब प्रकल्पात ते असिस्टंट मॅनेजर पदावर कार्यरत आहेत.

देशातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित महत्त्वाकांक्षी प्रकल्पात काम करण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या यशाचे परिसरातून कौतुक होत आहे.सागर जाधव यांचे प्राथमिक शिक्षण बोंडशेत येथील प्राथमिक शाळेत झाले. त्यानंतर त्यांनी कुंडलिका विद्यालय, पाटणूस तसेच टाटा विद्यालय, भिरा येथे



माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पुढे जे. एन. पालीवाला कॉलेज, पाली येथून त्यांनी बी.एस्सी. केमिस्ट्री ही पदवी प्राप्त केली. त्यानंतर लोणेरे येथील आयओपीई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठातून ॲडव्हान्स डिप्लोमा इन वॉटर क्वालिटी मॅनेजमेंट ही प्रगत पदविका पूर्ण केली.शिक्षण पूर्ण केल्यानंतर सागर जाधव यांनी जलशुद्धीकरण, फार्मास्युटिकल आणि बायोफार्मास्युटिकल उद्योगातील क्लीन युटिलिटी, वॉटर सिस्टीम, प्रकल्प अंमलबजावणी तसेच कमिशनिंग या क्षेत्रात काम केले.

## शिक्षण आणि सहकार्यातूनच समाजाची प्रगती –पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे




**चौक : प्रतिनिधी**

कोणत्याही समाजाची प्रगती शिक्षण, परस्पर सहकार्य आणि एकजुटीतून होते. शिक्षित समाजामुळे येणाऱ्या पिढीच्या कौशल्य विकासाला चालना मिळते व समाजाची आर्थिक, मानसिक प्रगती होते, असे उद्गार सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे यांनी काढले. कोयना क्षत्रिय मराठा समाज सेवा संघ यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

वावंढळ, ता. खालापूर येथे अध्यक्ष अरुणराव साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा संपन्न झाली. त्याग करणे, स्वाभिमान जपणे, सहकार्याची भावना जपणे आणि आपला समाज शिक्षित कसा होईल याचा ध्यास घेणारी माणसे म्हणजे कोयना प्रकल्पग्रस्त, हा सुंदर गाव आणखी सुंदर करण्यासाठी मी सभापती म्हणून प्रयत्नशील राहीन, असे आश्वासन खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांनी दिले. कोयना क्षत्रिय मराठा समाज सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्याचा मान खालापूर तालुक्यातील वावंढळ गावाला मिळाला. संघाचे कार्य, ध्येय धोरण, पुढील वाटचाल याचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष अर्जुन कदम यांनी केले. कार्यअहवालाचे वाचन सरचिटणीस मिलिंद मोरे, लेखाजोखाचे वाचन खजिनदार सुमित कदम तर आर्थिक उन्नतीबाबत राजेश कदम यांनी मार्गदर्शन केले.

महिला सक्षमीकरण, युवांना रोजगार संधी, कौशल्य विकास यावर अध्यक्ष अरुणराव साळुंखे यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन केले.यावेळी महिला सचिव कृतिका कदम, आरती मोरे, अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघ अध्यक्ष पवन कदम, नगरसेवक समीर कदम, ज्येष्ठ नेते सुरेश कदम, विजय मोरे, दिलीप कदम, राजेंद्र साळुंखे, शिवाजी मोरे, आर्थिक सल्लागार मनीषा मोरे, ज्योत्स्ना साळुंखे, पी. के. मोरे, प्रभाकर मोरे, महेश कदम, मिलिंद चव्हाण यांच्यासह सातारा, रायगड, ठाणे, पालघर जिल्ह्यातील समाज बांधव, महिला, तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरपंच सुहास कदम यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विलास कदम, जयवंत कदम, परशुराम कदम, गौरव कदम, सदानंद कदम, रोहित कदम यांच्यासह ग्रामस्थ, महिला मंडळ, तरुण मंडळी यांनी विशेष मेहनत घेतली. सभेचे सूत्रसंचालन ठाणे जिल्हा अध्यक्ष सूर्यकांत कदम यांनी केले.

## 'सेंट विल्फ्रेड्स'मध्ये विकसित भारत अंतर्गत स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सेंट विल्फ्रेड्स कॉलेज ऑफ लॉच्या वतीने आणि मुंबई विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ लॉच्या सहकार्याने विकसित भारत २०४७ या संकल्पनेअंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून महात्मा गांधी जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात विकसित भारत, नशामुक्त भारत या विषयावर पोस्टर मेकिंग तसेच प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली.



कार्यक्रमाला छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, पनवेलच्या विधी विभागाचे अधिष्ठाता डॉ. एस. पी. मिश्रा प्रमुख पाहुणे व परीक्षक म्हणून उपस्थित होते. प्राचार्या डॉ. अवनी मिस्त्री, प्रा. डॉ. बसंती नेगी, प्रा. अक्षय हिवाळे, प्रा. मोनिका कोलकर आणि प्रा. अनिल राजगुरू यांचीही प्रमुख उपस्थिती होती.महात्मा गांधी यांच्या विचारांचे स्मरण करत विद्यार्थ्यांनी स्वच्छता, व्यसनमुक्ती, सामाजिक जबाबदारी, अहिंसा आणि राष्ट्रनिर्मिती या विषयांवर आपले विचार मांडले. नशामुक्त भारत या विषयावर विद्यार्थ्यांनी आकर्षक आणि संदेशात्मक पोस्टर्स तयार करून व्यसनमुक्त समाज, युवकांची सामाजिक जबाबदारी आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले.

पोस्टर मेकिंग स्पर्धेचे परीक्षण डॉ. एस. पी. मिश्रा यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या कलाकृतींची पाहणी केली. त्यानंतर स्पर्धेतील विजेत्यांची घोषणा करून त्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला चालना देण्यासाठी प्रश्नमंजुषा स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले.

## आरपीआय जिल्हाध्यक्षांवरील शाईफेक प्रकरणाने खळबळ

**पाली :** रायगडच्या राजकीय वर्तुळात आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांच्यावर झालेल्या कथित शाईफेक प्रकरणाने खळबळ उडाली असून या घटनेनंतर गायकवाड यांनी संभाव्य धमकी, छळ, मारहाण तसेच खोटी किंवा बनावट तक्रार दाखल होण्याची भीती व्यक्त करत रायगड पोलीस अधीक्षक कार्यालयात निवेदन दिले आहे.

पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस अधिकारी मिलिंद खोपडे यांनी हे निवेदन स्वीकारले. नरेंद्र गायकवाड यांच्या पत्नी मालती गायकवाड यांनी ३० सप्टेंबर रोजी दाखल केलेल्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर गायकवाड आणि त्यांच्या कुटुंबीयांना भविष्यात कोणताही दबाव, धमकी किंवा प्रतिशोधाला सामोरे जावे लागू नये, यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई आणि सुरक्षेची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ आरपीआय पक्षाचे कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे, कार्याध्यक्ष राहुल डाळींबकर आणि संघटक रवींद्र ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली आरपीआयचे तालुकाध्यक्ष, पदाधिकारी आणि कार्यकर्ते पोलीस अधीक्षक कार्यालयात दाखल झाले.

गायकवाड यांच्यावर झालेली कथित शाईफेक ही पक्षाच्या नेतृत्वावरील हल्ला असल्याचा आरोप प्रकाश मोरे यांनी केला, तर संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे, कार्याध्यक्ष राहुल डाळींबकर व अन्य पदाधिकारी यांनी केली. यावेळी रायगड जिल्ह्यातील आरपीआयचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा शरदरत्न जीवनगौरव पुरस्काराने यथोचित सन्मान

स्व. दि.बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी झालेल्या विविध आंदोलनांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. जमीन, रोजगार, घरे, साडेबारा टक्के योजना आणि प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांसाठी झालेल्या लढ्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. १९८१ आणि १९८४मधील आंदोलनांदरम्यान त्यांनी संघर्षाची धुरा पुढे नेली. या संघर्षातून निर्माण झालेला जनविश्वास त्यांच्या सार्वजनिक जीवनातील मोठी ताकद ठरला. याच जनविश्वासाच्या बळावर त्यांनी लोकसभेपर्यंतची वाटचाल करीत दोन वेळा खासदार म्हणून काम केले. राजकीय क्षेत्रात यश मिळाल्यानंतरही पद आणि सत्ता हे अंतिम ध्येय न मानता त्यांनी समाजकारणाला प्राधान्य दिले. वयाच्या ५२व्या वर्षी निवडणुकीच्या राजकारणापासून दूर होऊन समाजकार्याला अधिक वेळ देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यानंतर शिक्षण, आरोग्य, क्रीडा, कला, संस्कृती, रोजगार आणि सामाजिक मदत अशा विविध क्षेत्रांत त्यांच्या कार्याचा विस्तार झाला. 'समाजाने आपल्याला दिले, ते समाजाला परत केले पाहिजे' या भावनेतून त्यांचे सेवाकार्य पुढे सुरूच राहिले.

रयत शिक्षण संस्थेने दिलेले संस्कार आणि शिक्षणाचे ऋण फेडणे हीच खरी गुरुदक्षिणा या भावनेतून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिक्षण क्षेत्रासाठी मोठे योगदान दिले. रयत शिक्षण संस्थेच्या शाळा, महाविद्यालये आणि विविध शैक्षणिक सुविधांसाठी त्यांनी १३५ कोटी रुपयांहून अधिक मदत केली आहे. आर्थिक अडचणींमुळे एखाद्या विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, ग्रामीण व गरजू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांनी सातत्याने मदतीचा हात पुढे केला. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान हे केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित न राहता अनेक पिढ्यांचे भविष्य घडविणारे योगदान ठरले आहे.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, गरजू कुटुंबांना सहाय्य, आरोग्यविषयक उपक्रम, सामाजिक कार्य, क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक उपक्रमांना सातत्याने पाठबळ देण्यात आले आहे. क्रीडापटूंना संधी, कलाकारांना व्यासपीठ, विद्यार्थ्यांना आधार आणि गरजू कुटुंबांना मदतीचा हात देताना त्यांच्या कार्यामध्ये दानशूरपणा, सामाजिक दायित्वाची भावना अधिक ठळकपणे दिसून आली आहे. .

लोकनेते रामशेठ ठाकूर यांची ओळख केवळ एका राजकीय नेत्याची किंवा उद्योजकाची नसून सामान्य माणसांच्या सुख-दुःखात सहभागी होणाऱ्या आपल्या माणसाची आहे. मोठमोठ्या पदांवर काम करूनही सर्वसामान्यांशी असलेला संवाद आणि संपर्क त्यांनी कायम जपला. याच सहजतेमुळे त्यांच्याभोवती माणसांचे नाते निर्माण झाले. गरिबांसाठी आधार, विद्यार्थ्यांसाठी मदतीचा हात, तरुणांसाठी संधी, कलाकारांसाठी व्यासपीठ आणि समाजासाठी कार्यकर्ता अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विविध रूपे या जीवनप्रवासात दिसून येतात.

व्यवसायातून आर्थिक स्थैर्य मिळवतानाच भूमिपुत्रांच्या हक्कासाठी संघर्ष करणे, लोकप्रतिनिधी म्हणून जनतेचे प्रश्न मांडणे, शिक्षण क्षेत्राला भक्कम आधार देणे आणि त्यानंतर समाजकारणाला अधिक वेळ देत निस्वार्थपणे सेवा करणे या संपूर्ण प्रवासाचा सन्मान शरदरत्न जीवनगौरव पुरस्कार या मानाच्या पुरस्काराने झाला आहे. आपल्या यशाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी करण्याची, गोरगरिबांच्या पाठीशी उभे राहण्याची आणि आपल्या मातीशी व माणसांशी असलेली नाळ अखेरपर्यंत जपण्याची त्यांची वाटचाल या जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित झाली आहे.

## उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

भातशेती व फळ लागवड रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात व्हावी, जुन्या लोकांबरोबरच नवीन पिढीने सुद्धा शेतीमध्ये लक्ष केंद्रित करावे यासाठी रायगड जिल्हा परिषदेमार्फत शेती क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा शेताच्या बांधावर जाऊन सत्कार करण्यात येतो. मुरुड तालुक्यामधील शेती क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांचा सत्कार रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या ज्योती नागावकर यांच्या हस्ते करण्यात आला.



रायगड जिल्हा परिषदेमार्फत कृषी क्षेत्रात उल्लेखनीय व प्रगतिशील कार्य करणाऱ्या शेतकरी रेशमा मिसाळ, क्लेमेंट मार्टिस आणि डॉमनिक रुजारियो यांचा जिल्हा परिषद सदस्या ज्योती रमेश नागावकर यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी सत्कारमूर्ती शेतकऱ्यांना शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.यावेळी जिल्हा परिषद सदस्या ज्योती नागावकर यांनी सांगितले की, देशाचा अन्नदाता हा शेतकरी आहे. दिवसभर काबाडकष्ट करून शेतामध्ये अन्न तयार करतो.

त्यामध्ये सुद्धा त्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागते तरी सुद्धा हिंमत न हरता ते शेती करतात ही एक वाखाणण्यासारखी बाब असून त्यांचे कौतुक हे त्यांच्या घरी जाऊन करण्याची मला संधी मिळाली याचा आनंद होत असल्याचे प्रतिपादन यावेळी नागावकर यांनी व्यक्त केले.शेतकऱ्यांच्या कष्टाचा सन्मान केवळ सभागृहात न करता थेट शेताच्या बांधावर जाऊन करण्याचा आगळा उपक्रम जिल्हा परिषद सदस्या ज्योती नागावकर यांनी राबविला. शेतकऱ्यांच्या मेहनतीला प्रोत्साहन देत त्यांच्या कार्याची दखल घेणे आणि कृषी क्षेत्रातील प्रगतिशील शेतकऱ्यांना पाठबळ देण्याचा संदेश यावेळी त्यांनी दिला.

यावेळी जिल्हा कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन, तालुका कृषी अधिकारी वसंत दळवी, पंचायत समिती मुरुडचे माजी सभापती रमेश नागावकर, शिवसेना उपतालुका प्रमुख भागीरथ पाटील, कोर्लई ग्रामपंचायत सरपंच राजश्री मिसाळ, बोर्ली ग्रामपंचायत सरपंच सपना जावसेन तसेच कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी व स्थानिक मान्यवर उपस्थित होते.

## पाले बुद्रुकमध्ये वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरण संवर्धन आणि हरित परिसर निर्मितीचा संदेश देत डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून सुकापूर येथील बैठकीअंतर्गत पाले बुद्रुक फणसवाडी येथे वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन उपक्रम राबविण्यात आला असून या उपक्रमात विविध झाडांची लागवड करण्यात आली.



वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी अधिकाधिक वृक्षलागवड आणि त्यांचे संवर्धन आवश्यक असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी अमित अरविंद पोतदार तसेच सौरभ देशमुख, सागर देशमुख आणि अमोल पाटील यांची उपस्थिती होती.

## कर्जतमध्ये रक्तदान शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील नगर परिषदेच्या वतीने आरोग्य विभागाच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. पालिकेच्या तळमजल्यावर आयोजित रक्तदान शिबिरात पालिका कर्मचारी आणि शहरातील नागरिकांनी रक्तदान केले.

महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात रक्तसंक्रमण रायगड हॉस्पिटल रक्तपेढीकडून करण्यात आले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्षा पुष्पा दगडे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपनगराध्यक्ष आणि आरोग्य समिती सभापती संतोष पाटील, माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, नगरसेवक अशोक राऊत, महेंद्र चंदन, रामदास गायकवाड, राजाभाऊ कोठारी, अंजली कडू, सुचिता खोत, मानसी कानिटकर, जान्हवी देवघरे, सुमिता गायकवाड आदी उपस्थित होते.

# हरित पनवेलकडे झेप!

## एक पेड माँ के नाम मोहीम उत्साहात, ७०० वृक्षांची लागवड





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेची बांधिलकी जपत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता ही सेवा २०२६ आणि सेवा संकल्प अभियान अंतर्गत पनवेल महानगरपालिकेतर्फे बुधवारी (दि. ७) चारही प्रभागांमध्ये विशेष वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली असून एक पेड माँ के नाम या प्रेरणादायी उपक्रमांतर्गत प्रत्येक प्रभागात विविध प्रकारची सुमारे ७०० वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

या मोहिमेदरम्यान करंज, जांभूळ, आवळा, कदंब, बकुळ यांसह विविध पर्यावरणपूरक व औषधी वृक्षांची लागवड करण्यात आली. प्रभाग समिती अ मध्ये नगरसेविका योगिता समीर फडके, विजयश्री संतोष पाटील, लीना नंदकुमार म्हात्रे, नगरसेवक रवींद्र भगत, नगरसेविका मोनिका महानावर, तसेच सायली सरक आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. प्रभाग समिती ब मध्ये नगरसेवक हरेश केणी, तुषार पाटील, नगरसेविका प्रगती पाटील, लीना गरड आणि नगरसेवक उत्तम मोर्बेकर यांनी सहभाग घेतला. रोटरी क्लब ऑफ सनराईजच्या छाया तारळेकर, सेक्टर ११ येथील रायन स्कूलचे विद्यार्थी व शिक्षकही या उपक्रमात सहभागी झाले.

प्रभाग समिती क मध्ये नगरसेविका सीताताई पाटील, समाजसेवक सुनील गोवारी, विनय गोवारी उपस्थित होते. प्रभाग समिती ड मध्ये महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, प्रभाग समिती ड चे सभापती अजय बहिरा, नगरसेविका स्नेहल ढमाले, नगरसेवक मनोज भुजबळ, नगरसेविका श्वेता बहिरा, प्रियांका कांडपिळे, रुचिता लोंढे, नगरसेवक गणेश कडू, केतन भगत, लतीफ शेख, नगरसेविका आर्या जाधव, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे आणि माजी नगरसेविका सुरेखा मोहकर, समाजसेवक प्रवीण जाधव यांच्यासह इतर मान्यवर आणि एनएसएसचे विद्यार्थी उपस्थित होते.

वृक्षारोपण मोहिमेला पनवेल परिसरातील विविध सामाजिक संस्था, महिला मंडळे आणि समाजसेविकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उद्यान विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या सूचनेनुसार तसेच सहाय्यक आयुक्त रुपाली माने आणि विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान पर्यवेक्षक नितीन राठोड, विशाल हुडेकर, सिद्धार्थ कांबळे, मांगीलाल जाधव, कनिष्ठ अभियंते साकेत पाटील, अतिश पाटील यांच्यासह उद्यान विभागातील कर्मचाऱ्यांनी मोहिमेचे नियोजन व आयोजन केले.या वेळी महानगरपालिकेचे आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, जितेंद्र मढवी तसेच सर्व प्रभागांतील स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

वृक्षारोपणाच्या माध्यमातून केवळ झाडे लावण्यापुरते मर्यादित न राहता लावलेल्या रोपांचे योग्य संगोपन व संवर्धन करण्याचा दृढ संकल्प उपस्थितांनी केला. स्वच्छता ही सेवा अभियानाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत पनवेल शहर अधिक आरोग्यदायी, हरित आणि निसर्गरम्य करण्याच्या दिशेने महानगरपालिकेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. एक पेड माँ के नाम उपक्रमांतर्गत मातांच्या गौरवार्थ लावण्यात आलेली ही झाडे भविष्यातील पिढ्यांसाठी शुद्ध हवा, सावली आणि पर्यावरणीय समृद्धीचा अमूल्य वारसा ठरतील, असा विश्वास यावेळी अधिकारी व लोकप्रतिनिधींनी व्यक्त केला.

# पनवेल मनपाच्या आरोग्य शिबिराला महिलांचा प्रतिसाद





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत महिला व बालकल्याण विभाग आणि वैद्यकीय आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने प्रभाग ड अंतर्गत दि. बा. पाटील विद्यालयात विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात महिलांना विविध आजारांवर मोफत तपासणी व तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन देण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सभागृहनेते प्रकाश बिनेदार, प्रभाग समिती ड चे सभापती अजय बहिरा, महापालिका सदस्य सुमित झुंजारराव, मनीषा म्हात्रे आणि आर्या जाधव, आरती कुलकर्णी, रीना कारकिल्ले, डॉ. ज्योती उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना महिला बालकल्याण सभापती ममता म्हात्रे म्हणाल्या की, सर्वसामान्यपणे महिला वर्गामध्ये चाळीशीनंतर सांधेदुखी, आमवात ही समस्या सर्वत्र दिसून येते. महिलांना याविषयी मार्गदर्शन मिळावे या हेतूने या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

महापालिकेच्या अशा आरोग्य शिबिरांमध्ये सर्व आरोग्यसेवा एकाच छताखाली मिळत असल्याने महिलांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

**पुढील शिबिरे :**
- ८ ऑक्टोबर – प्रभाग अ : काळभैरव सभागृह, कळंबोली
- ९ ऑक्टोबर – प्रभाग क : प्रभाग समिती कार्यालय, कामोठे
- १० ऑक्टोबर – प्रभाग ब : ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, सेक्टर १५, खारघर

प्रभाग समिती ड चे सभापती अजय बहिरा यांनी सांगितले की, पनवेल महानगरपालिका नेहमीच आरोग्यसेवेला प्राधान्य देत आली आहे. महापालिकेने आता स्वतःची लॅब सुरू केली आहे. ज्या महिलांना बाहेरच्या लॅबमध्ये जाऊन तपासणी करणे शक्य नाही, त्यांनी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रावर जाऊन तपासण्या कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले. या शिबिरात महिलांना विविध आरोग्यविषयक समस्यांवर मोफत तपासणी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळाले. सांधेदुखी, गुडघेदुखी, हात-पायांची सूज व मुंग्या येणे, नसांशी संबंधित त्रास तसेच मान, पाठ व कंबरदुखी अशा समस्यांवर मोफत तपासणी व तज्ज्ञ मार्गदर्शन मिळाले. तसेच उच्च रक्तदाब, मधुमेह, नेत्ररोग व दंतरोग तपासणी, स्तन, गर्भाशय मुख आणि मुख कर्करोग तपासणी, गरोदर महिलांसाठी प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण सेवा, रक्त आणि हिमोग्लोबिन तपासणी, क्षयरोग तपासणी, मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया आणि लेप्टोस्पायरोसिस तपासणी, सिकलसेल आजार व रक्तक्षय तपासणी अशा विविध आरोग्यसेवा देण्यात आल्या.

यावेळी सुमारे २००हून अधिक लाभार्थ्यांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. यामध्ये २६६ महिलांनी गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग तपासणीसाठी पॅप स्मीअर टेस्ट केली. तसेच इतर आरोग्य सेवांचाही महिलांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. आरोग्य शिबिरास महापालिका सदस्य प्रिती जॉर्ज, स्नेहल ढमाले, श्वेता बहिरा, प्रियंका कांडपिळे यांनी भेट दिली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या आरोग्य तपासणी शिबिरास मुख्य वैद्यकीय अधिकारी आनंद गोसावी, क्षयरोग अधिकारी उषा राठोड, वैद्यकीय अधिकारी रेहाना मुजावर, मनीषा चांडक, सुरेश पंडित, भक्तराज भोईटे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते. आरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# डेरवली शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप



**पनवेल : वार्ताहर**

सामाजिक बांधिलकी जपत लायन्स क्लब ऑफ सरगम पनवेलच्या वतीने पनवेल तालुक्यातील डेरवली जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची कमतरता भासू नये आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाला लायन्स डिस्ट्रिक्ट रिजनचे चेअरमन अल्केश शहा, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी, लायन्स क्लब ऑफ सरगम पनवेलचे अध्यक्ष आदित्य दोशी, सचिव मानदा पंडित, माजी अध्यक्ष स्वाती गोडसे, उपाध्यक्ष संध्या महानुभाव, धवल शहा, डिस्ट्रिक्टचे सहखजिनदार संजय गोडसे, सुयोग पेंडसे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका मानसी भोसले, शिक्षक रवींद्र रोटकर, विजेता पाटील आणि वर्षा पाटील उपस्थित होते. यावेळी अल्केश शहा, संजय गोडसे, गणेश कोळी आणि आदित्य दोशी यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका मानसी भोसले यांनी केले. शाळेतील नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतल्याबद्दल लायन्स क्लब ऑफ सरगम पनवेलच्या वतीने मुख्याध्यापिका मानसी भोसले यांचा सत्कार करण्यात आला. या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला.

# चिमुकल्यांसाठी गौ-मिलन कार्यक्रम उत्साहात



**खारघर : रामप्रहर वृत्त**

पितृपक्षानिमित्त भारतीय संस्कृती, परंपरा आणि गौसेवेचे महत्त्व बालमनावर रुजविण्याच्या उद्देशाने भारत रक्षा मंच, कोकण प्रांतच्या खारघर शाखेतर्फे चिमुकल्यांसाठी गौ-मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. खारघर येथील श्री आई माता गौशाळेत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. हिंदू संस्कृतीमध्ये पितृपक्षाला विशेष महत्त्व असून या कालावधीत पितरांचे स्मरण करून दानधर्म व विविध धार्मिक उपक्रम केले जातात.

याच पार्श्वभूमीवर मुलांना आपल्या संस्कृतीशी आणि परंपरांशी लहान वयातच जोडण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. आपल्या जीवनासाठी निसर्गातील विविध घटक तसेच पशुधनाचे मोठे योगदान आहे. त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करणे, सेवा करणे आणि संवेदनशीलतेची भावना जपणे ही भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. हीच शिकवण पुढील पिढीपर्यंत पोहचावी या उद्देशाने गौ-मिलन कार्यक्रमाची संकल्पना राबवण्यात आली. यावेळी भारत रक्षा मंचच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष बीना गोगरी यांनी सांगितले की, चिमुकल्या वयातच मुलांना आपल्या संस्कृतीची आणि परंपरांची ओळख झाली तर त्यांच्यामध्ये सेवा, करुणा, कृतज्ञता आणि संवेदनशीलतेचे संस्कार रुजण्यास मदत होते. याच उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात मोठ्या संख्येने मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. चिमुकल्यांनी स्वतःच्या हाताने गायींना गवत, केळी, गूळ तसेच विविध भाज्या खाऊ घातल्या. गायींसोबत वेळ घालवताना मुलांनी गौसेवेचा मनमुराद आनंद घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंजू पटेल, स्मिता आचार्य, नीता गोगरी, समता मोदी आणि उषा पटेल यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमास उपस्थित असलेल्या पालकांनी या आगळ्यावेगळ्या आणि संस्कारक्षम उपक्रमाचे कौतुक करीत भारत रक्षा मंचचे आभार मानले.

# महसूल विभागातील तीन लाचखोर जाळ्यात

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील कोप्रोली मंडळ कार्यालयात सातबारा उताऱ्यावर नोंदणी करण्यासाठी एक लाखांची लाच स्वीकारताना महसूलचे मंडळ अधिकारी, तलाठी आणि मदतनीस या उरण महसूल विभागातील तिघा लाचखोरांना नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून ताब्यात घेतले आहे. तक्रारदाराकडे जमीन सातबारावर नोंदणी करण्यासाठी उरण तालुक्यातील कोप्रोली मंडळ विभागातील महसूलचे मंडळ अधिकारी केशव डी. मोहिते यांनी दीड लाखांच्या लाचेची मागणी केली होती.

त्यानंतर घासाघाशीत एक लाखावर सौदा पक्का झाला, मात्र तक्रारदाराने एक लाखाची लाच मागितल्याप्रकरणी नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. पडताळणीनंतर नवी मुंबई लाचलुचपत विभागाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुंधती येवले यांनी मागोवा घेत कोप्रोली मंडळ कार्यालयाजवळ सापळा रचला होता. ६ ऑक्टोबर रोजी एक लाखाची लाच घेताना कोप्रोली मंडळ विभागाचे मंडळ अधिकारी केशव डी. मोहिते, चिरनेर तलाठी जयहिंद कोळी, खासगी मदतनीस मोनिका पाटील यांना ताब्यात घेतले. उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुंधती येवले यांनी दिली.

# लोकनृत्य स्पर्धेत उरण महाविद्यालयास द्वितीय क्रमांक

**उरण : बातमीदार**

मुंबई विद्यापीठाच्या ५९व्या सांस्कृतिक युवा महोत्सवाच्या अंतिम फेरीत लोकनृत्य स्पर्धेत कोंकण ज्ञानपीठ महाविद्यालय, उरणने उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले असून या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या अंतिम फेरीत मुंबई विद्यापीठांतर्गत तब्बल ५७ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता.

यामध्ये कोंकण ज्ञानपीठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट सादरीकरणातून परीक्षकांची मने जिंकत द्वितीय क्रमांक मिळवला.या उल्लेखनीय यशामागे महाविद्यालयाचे प्राचार्य वाल्मिक गर्जे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख पराग कारुळकर, सांस्कृतिक समिती, सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान राहिले.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल व्यवस्थापन, प्राचार्य, सांस्कृतिक विभाग तसेच शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांकडून विजेत्या संघाचे अभिनंदन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी महाविद्यालयाकडून सातत्याने घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे हे यशस्वी फलित असल्याचे यावेळी सांगण्यात आले.




# चिरनेरमध्ये वन्यजीव सप्ताहानिमित्त जनजागृती



**उरण : बातमीदार**

पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे ठकूबाई परशुराम खारपाटील मराठी माध्यम स्कूल व ज्युनिअर कॉलेज, चिरनेर येथे महाराष्ट्र शासन वनविभाग, अलिबाग वनविभाग, उरण वनपरिक्षेत्र आणि फ्रेंड्स ऑफ नेचर सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था, चिरनेर यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थ्यांना वनविभाग तसेच फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. वन्यजीव सप्ताह का साजरा केला जातो, वन्यजीव-मानव संघर्ष, वैश्विक तापमानवाढ, प्रदूषण, भविष्यात निर्माण होणाऱ्या मानवनिर्मित समस्या, परिसंस्थेचे महत्त्व, अन्नसाखळी, तसेच मानवी जीवनातील वन्यजीवांचे स्थान आणि वन्यजीवांपासून मानवाला मिळणारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी वन्यजीव संरक्षण व संवर्धन, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन, पाणी संवर्धन तसेच पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयवंत रामदास ठाकूर तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी विवेक राजूरकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शालेय विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष वन्यजीव, निसर्ग आणि परिसंस्थेच्या संरक्षण-संवर्धनाचा अनुभव मिळावा, या उद्देशाने शासनस्तरावर तसेच विविध निसर्गसंवर्धन संस्थांच्या माध्यमातून अशा जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांच्या मनात लहान वयातच वन्यजीव संरक्षण, निसर्गसंवर्धन आणि पर्यावरणीय जबाबदारीची मूल्ये रुजविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.या कार्यक्रमासाठी ठकूबाई परशुराम खारपाटील मराठी माध्यम स्कूल व ज्युनिअर कॉलेज, चिरनेर येथील प्राचार्य मिलिंद पट्टेबहाद्दूर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमास उरण वनविभागाचे वनपरिमंडळ अधिकारी खाडे, नियतक्षेत्र अधिकारी भूषण साळुंखे व अनिकेत झेंड, फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेचे सदस्य हिम्मत केणी, राकेश शिंदे, निकेतन रमेश ठाकूर, प्रथमेश मोकल उपस्थित होते.

# जसखार ग्रामसुधारणा मंडळाच्या सेक्रेटरीपदी सुरज कडू यांची निवड

**उरण : वार्ताहर**

जसखार ग्रामसुधारणा मंडळाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत आमदार महेश बालदी यांचे समर्थक म्हणून ओळखले जाणारे सुरज कडू यांची सेक्रेटरीपदी निवड झाली. सेक्रेटरीपदाच्या निवडणुकीत सुरज कडू यांनी ६९ मते मिळवत राकेश तांडेल यांचा पराभव केला. राकेश तांडेल यांना ५२ मते मिळाली. महालन विभागप्रमुख महेश कडू, उद्योगपती जितेंद्र घरत, उपनगराध्यक्ष रविशेठ भोईर, माजी सरपंच दामोदरशेठ घरत, युवा मोर्चा सरचिटणीस उरण विशाल तांडेल तसेच भारतीय जनता पार्टी जसखार अध्यक्ष अक्षय घरत यांनी सुरज कडू यांच्या बाजूने भूमिका घेतल्याचे सांगितले जात आहे.

या स्थानिक नेते व पदाधिकाऱ्यांच्या पाठिंब्यामुळे सुरज कडू यांना निवडणुकीत संघटनात्मक बळ मिळाले आणि त्यांचा विजय अधिक सोपा झाला. नवनिर्वाचित सेक्रेटरी सुरज कडू यांनी ग्रामसुधारणा मंडळाच्या माध्यमातून गावातील सामाजिक, विकासात्मक आणि नागरी प्रश्नांसाठी काम करण्याची भूमिका घेतली असून ग्रामस्थांनी दिलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.





**पनवेल : भाजप युवा कार्यकर्ते चिन्मय समेळ यांना वाढदिवसानिमित्त माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर उपस्थित होते.**

## संपादकीय

# अराजकतेचा आधार?

निवडणूक आयोगाच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार विरोधकांना जरुर आहे. परंतु अशा प्रश्नांची उत्तरे त्यांनी घटनात्मक आणि लोकशाही मार्गाने शोधणेच योग्य आणि अपेक्षित आहे. बिनबुडाचे प्रश्न उपस्थित करून रस्त्यावर गोंधळ घालणे व जनतेची दिशाभूल करणे हे लोकशाहीला बळकटी देणारे निश्चितच नाही.

लोकशाहीत निवडणूक आयोगाची विश्वासार्हता ही केवळ एका संस्थेची प्रतिष्ठा नसून संपूर्ण लोकशाही व्यवस्थेच्या विश्वासाचा आधार असते. सध्या काँग्रेस आणि इंडी आघाडीने निवडणूक आयोगाविरोधात उभारलेले आंदोलन याच कारणामुळे संशय निर्माण करणारे ठरत आहे. राजधानी नवी दिल्लीत मंगळवारी विरोधी पक्षनेते राहुल गांधी, खासदार प्रियांका गांधी यांच्यासह इंडी आघाडीच्या नेत्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत मोर्चा काढला. आकाशवाणी भवन परिसरात तब्बल नऊ तास त्यांनी ठिय्या आंदोलन केल्यानंतर पोलिसांनी या नेत्यांना ताब्यात घेतले. मात्र बुधवारी दुसऱ्या दिवशीही आंदोलन सुरूच राहिले. विरोधी पक्षांच्या नेत्यांना पोलिसांनी पुन्हा रोखले आणि पुन्हा अनेक नेत्यांना ताब्यात घेण्यात आले. निवडणूक आयोगाच्या 'एसआयआर' मोहिमेवर तीव्र आक्षेप घेऊन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी इंडी आघाडीचे नेते करीत आहेत. वास्तविक देशात राबवण्यात आलेली 'एसआयआर' म्हणजेच मतदारयादीची विशेष सुधारणा प्रक्रिया मोहीम ही मतदारयादी अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत १३ कोटी अपात्र मतदारांची नावे वगळली गेली आहेत याला विरोधक आक्षेप घेत आहेत. परंतु ही प्राथमिक यादीतून वगळली गेलेली नावे आहेत आणि अंतिम प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. आयोगाने पात्र पण वगळल्या गेलेल्या मतदारांसाठी विशेष नोंदणी मोहीमही सुरू केली आहे. तरीही इंडी आघाडीला एसआयआरची एवढी भीती का वाटते आहे? यातले वगळले गेलेले मृत वा दुबार मतदार त्यांच्या राजकीय गणिताचा आधार होते का? इतकी वर्षे सत्तेचा लाभ त्यांना यामुळे मिळाला होता का? २०२९ची निवडणूक आपले राजकीय अस्तित्वच संपवू शकते अशी असुरक्षितता विरोधकांच्या मनात निर्माण झाली आहे का? सध्या सुरू असलेले आंदोलननाट्य पाहता जनतेच्या मनात हे प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. मतदारयादीतील नावांच्या नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्म ६ बाबतही काँग्रेस पक्षाने कांगावा केला आहे. परंतु निवडणूक आयोगाने त्यासंदर्भातही आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मग इंडी आघाडीच्या आंदोलनाचा नेमका उद्देश काय? मतदारयादीत त्रुटी असतील तर त्या दाखवा, पुरावे द्या, आयोगाकडे हरकती नोंदवा. आयोगाने दिलेल्या प्रक्रियेचा वापर करा. परंतु यातले काहीही न करता, घटनात्मक संस्थेवरच अविश्वास निर्माण करून रस्त्यावर संघर्ष उभा करणे हा लोकशाही बळकट करण्याचा नव्हे, तर राजकीय निराशेचा मार्ग आहे. जनतेच्या प्रश्नांवर ठोस कार्यक्रम देण्याची क्षमता आणि निवडणुकीत जनतेचा विश्वास मिळवण्याची ताकद विरोधीपक्षांमध्ये असेल तर निवडणूक आयोगाला घाबरण्याचे कारणच काय? आपल्या राजकीय पराभवाचे आत्मपरीक्षण करण्याऐवजी प्रत्येक संस्थेलाच संशयाच्या भोवऱ्यात ओढणे यातून निव्वळ त्यांची राजकीय हतबलताच दिसून येते. २०२९च्या सार्वत्रिक निवडणुकीची चिंता विरोधकांना सतावत असेल तर तिचे उत्तर अराजकात नाही, जनतेच्या विश्वासात आहे. विरोधक हे जितक्या लवकर समजून घेतील, तितके ते त्यांच्यासाठी व देशाच्या लोकशाहीच्या दृष्टीनेही भल्याचे ठरेल.

# श्रमप्रतिष्ठा : प्रत्येक कामाचा सन्मान आवश्यक



श्रम म्हणजे कष्ट, मेहनत आणि परिश्रम. मानवी जीवनाचा पाया श्रमावरच उभा आहे. आपण जे अन्न खातो, जे कपडे घालतो आणि ज्या घरात राहतो, ते सर्व कोणाच्या ना कोणाच्या श्रमाचेच फळ आहे. शेतकरी शेतात राबतो म्हणून आपल्याला धान्य मिळते. विणकर कापड विणतो म्हणून आपल्याला वस्त्र मिळते. बांधकाम कामगार इमारती उभारतो म्हणून आपल्याला निवारा मिळतो. श्रमप्रतिष्ठा म्हणजे या प्रत्येक कष्टाचे मोल जाणणे आणि प्रत्येक कामाचा सन्मान करणे आहे. समाजात सर्व प्रकारची कामे आवश्यक असतात. शिक्षक शिकवतो, डॉक्टर उपचार करतो, अभियंता पूल बांधतो आणि सफाई कामगार परिसर स्वच्छ ठेवतो. यापैकी एकही काम कमी महत्त्वाचे नाही. सफाई कामगार नसता तर आपले शहर कसे दिसले असते, याची कल्पनाच करवत नाही. शेतकरी नसता तर आपल्या ताटात अन्न आले नसते. प्रत्येक काम समाजाच्या गाड्याचे एक चाक आहे. एकही चाक निखळले तर गाडा चालू शकत नाही. म्हणूनच कोणत्याही कामाला कमी लेखू नये.

कष्टाचे मोल पैशांपेक्षा मोठे असते. प्रामाणिकपणे केलेले कोणतेही काम व्यक्तीला आत्मसन्मान देते. स्वतःच्या कष्टाने मिळवलेली भाकर गोड लागते. कष्ट करणारी व्यक्ती स्वावलंबी बनते. ती दुसऱ्यावर अवलंबून राहत नाही. तिच्या मनात आत्मविश्वास असतो. कष्टातून मिळणारे समाधान इतर कोणत्याही सुखापेक्षा श्रेष्ठ असते. म्हणूनच श्रमाला प्रतिष्ठा मिळायला हवी. लहान मुलांमध्ये श्रमप्रतिष्ठेची भावना रुजवणे आवश्यक आहे. मुलांना घरातील छोटी कामे करू द्यावीत. आपली खोली स्वतः आवरायला शिकवावे. शाळेतील स्वच्छता उपक्रमात सहभागी करावे. बागकामाची आवड लावावी. काम करताना लाज वाटू नये, हे त्यांना समजावून सांगावे. जी मुले लहानपणी कष्टाची सवय लावतात, ती मोठेपणी परिश्रमी आणि जबाबदार नागरिक बनतात. शेतकऱ्यांच्या श्रमाचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य आहे. शेतकरी उन्हातान्हात राबतो. पावसाची वाट पाहतो. पिकांची काळजी घेतो. त्याच्या कष्टामुळेच आपले पोट भरते. आपण अन्न वाया घालवू नये. अन्नाचा प्रत्येक कण हा शेतकऱ्याच्या घामाचा आहे, याची जाणीव ठेवावी. शेतमालाला योग्य भाव मिळावा, यासाठी सहकार्य करावे. शेतकऱ्यांचा आदर करणे म्हणजे अन्नदेवतेचा आदर करणे आहे.

कारागिरांच्या कौशल्याचे कौतुक व्हावे. सुतार, लोहार, कुंभार आणि विणकर यांच्या हातात जादू असते. ते कच्च्या मालापासून सुंदर वस्तू घडवतात. त्यांची कला पिढ्यान्पिढ्या चालत आली आहे. या पारंपरिक कलांचे जतन व्हावे. त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी. कारागिरांच्या मुलांना त्यांच्या कलेचा अभिमान वाटावा. कौशल्याचा सन्मान हाच खरा विकास आहे. सेवा क्षेत्रातील कामगारांचाही सन्मान व्हावा. घरकाम करणाऱ्या महिला, वाहनचालक, सुरक्षा रक्षक आणि स्वयंपाकी यांच्या सेवेमुळे आपले जीवन सुसह्य होते. त्यांच्याशी आदराने वागावे. त्यांच्या कामाचे योग्य मोबदले द्यावेत. त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात. सणासुदीला त्यांच्या कार्याचे कौतुक करावे. छोट्या भेटवस्तूंमधून कृतज्ञता व्यक्त करावी. आदराचे दोन शब्द माणसाला मोठी ऊर्जा देतात. श्रमप्रतिष्ठेमुळे समाजात समानता निर्माण होते. कामावरून माणसाची किंमत ठरत नाही, तर त्याच्या प्रामाणिकपणावरून ठरते, ही भावना रुजते. उच्च आणि नीच असा भेदभाव कमी होतो. सर्वांना समान आदर मिळतो. समाजात बंधुभाव वाढतो. प्रत्येक व्यक्तीला आपल्या कामाचा अभिमान वाटतो. अशा समाजात प्रत्येकजण आनंदाने काम करतो.

युवकांनी कोणतेही काम करण्यास लाजू नये. पदवी घेतली म्हणजे फक्त खुर्चीचे काम करावे, हा समज चुकीचा आहे. शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्रात अनेक संधी आहेत. स्वतःचा व्यवसाय सुरू करणे हाही श्रमाचाच एक प्रकार आहे. कष्टाने उभारलेला छोटा उद्योगही अभिमानास्पद असतो. अनेक यशस्वी उद्योजकांनी छोट्या कामातून सुरुवात केली आहे. त्यांच्या जिद्दीतून आपण प्रेरणा घ्यावी. महिलांच्या श्रमाचा सन्मान विशेषत्वाने व्हावा. घर सांभाळणारी गृहिणी दिवसभर अविश्रांत कष्ट करते. स्वयंपाक, स्वच्छता आणि मुलांचे संगोपन या कामांना सुट्टी नसते. तिच्या श्रमाचे मोल पैशात मोजता येत नाही. कुटुंबातील प्रत्येकाने तिच्या कष्टाची जाणीव ठेवावी. तिच्या कामात हातभार लावावा. तिचे कौतुक करावे. काम करणाऱ्या महिलांनाही घर आणि नोकरी या दोन्ही आघाड्यांवर कष्ट करावे लागतात. त्यांच्या धडपडीला सलाम करावा. श्रमप्रतिष्ठा आणि शिक्षण यांचा सुंदर मेळ घालता येतो. शिक्षणामुळे कामाची गुणवत्ता वाढते. नवीन तंत्रज्ञान शिकल्याने उत्पादकता वाढते. कौशल्य विकास प्रशिक्षणातून तरुणांना रोजगार मिळतो. शिकलेला कारागीर अधिक चांगली निर्मिती करतो. शिकलेला शेतकरी आधुनिक पद्धतीने शेती करतो. शिक्षण आणि श्रम यांच्या संगमातून समृद्धी निर्माण होते.

सण आणि उत्सव यांच्या निमित्ताने श्रमिकांचा गौरव करावा. कामगार दिनासारख्या प्रसंगी त्यांच्या कार्याचे स्मरण व्हावे. शाळांमध्ये श्रमप्रतिष्ठेवर निबंध स्पर्धा घ्याव्यात. गावांमध्ये आदर्श श्रमिकांचा सत्कार करावा. त्यांच्या गोष्टी इतरांना सांगाव्यात. अशा उपक्रमांमधून समाजात श्रमाचा आदर वाढतो. आपल्या थोर व्यक्तींनी श्रमाचे महत्त्व पटवून दिले आहे. महात्मा गांधी स्वतः चरखा चालवत असत. ते शारीरिक श्रमाचा आदर करत. त्यांच्या जीवनातून आपण शिकतो की कोणतेही काम लहान नसते. संत तुकाराम म्हणतात की कष्टाशिवाय फळ मिळत नाही. या विचारांमधून श्रमप्रतिष्ठेची शिकवण मिळते. थोरांच्या जीवनाकडे पाहिल्यास कष्ट हेच यशाचे रहस्य असल्याचे दिसून येते. श्रमिकांच्या मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे. त्यांना चांगल्या शाळांमध्ये प्रवेश मिळावा. शिष्यवृत्त्यांचा लाभ मिळावा. त्यांच्या अंगी असलेल्या गुणांना वाव मिळावा. शिक्षणामुळे त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल. अनेक श्रमिकांची मुले शिक्षण घेऊन उच्च पदांवर पोहोचली आहेत. त्यांच्या यशोगाथा इतरांना प्रेरणा देतात. प्रत्येक मुलाला समान संधी मिळावी हाच खरा न्याय आहे.

कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण असावे. कामगारांना योग्य वेतन मिळावे. त्यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. विश्रांतीची सोय असावी. त्यांच्याशी सभ्य भाषेत बोलावे. त्यांच्या सूचना ऐकून घ्याव्यात. आनंदी कामगार अधिक चांगले काम करतो. त्यामुळे संस्थेचीही प्रगती होते. परस्पर आदरातून कामाचे वातावरण प्रसन्न राहते. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात श्रमाचा आदर कृतीतून दाखवावा. कष्ट करणाऱ्यांशी प्रेमाने वागावे. त्यांच्या कामाचे कौतुक करावे. हीच खरी संस्कृती आहे. शेवटी असे म्हणता येईल की श्रम हीच खरी पूजा आहे. कष्टाने मिळवलेले यश चिरकाल टिकते. प्रत्येक कामाचा सन्मान करणे ही सुसंस्कृत समाजाची ओळख आहे. चला आजच मनापासून संकल्प करूया. कोणत्याही प्रामाणिक कामाला कमी लेखणार नाही. कष्ट करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा आदर करूया. स्वतःही प्रामाणिकपणे नित्य कष्ट करूया. श्रमप्रतिष्ठेचा दीप प्रत्येक मनात तेवत राहो. श्रम हाच खरा धर्म आहे. कष्ट हेच खरे तप आहे. या भावनेतून समाजात नवी ऊर्जा निर्माण होईल. कष्टाची भाकर, समाधानाचे जीवन आणि सन्मानाचा समाज हेच आपले अंतिम ध्येय असावे. (साभार इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

# सावधान! एका क्लिकने बँक खाते होऊ शकते रिकामे



सणासुदीचा हंगाम सुरू होताच ऑनलाइन शॉपिंग, UPI पेमेंट आणि डिजिटल ऑफर्सचा वापर वाढतो. मोबाईलवर सतत सेल, कॅशबॅक आणि डिस्काउंटचे मेसेज येत राहतात. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर विविध ऑफर्सची रेलचेल असते. यासोबतच डिलिव्हरी, रिफंड किंवा बँकिंगशी संबंधित मेसेजही मोठ्या प्रमाणात येतात, मात्र डिजिटल व्यवहार वाढत असतानाच सायबर ठगही सक्रिय होतात.

क्विक हीलच्या India Cyber Threat Report २०२५नुसार भारतातील ८.४४ दशलक्ष एंडपॉइंट्सवर ३६९.०१ दशलक्ष मालवेअर डिटेक्शन नोंदवण्यात आले. म्हणजेच सरासरी दर मिनिटाला ७०२ डिटेक्शन झाल्याचे रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात ऑनलाइन व्यवहार करताना काही गोष्टींची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

सणासुदीच्या काळात 'फक्त आज', 'लिमिटेड कॅशबॅक', 'आत्ताच रिवॉर्ड क्लेम करा' अशा स्वरुपाचे मेसेज मोठ्या प्रमाणात येतात. अशा मेसेजचा उद्देश अनेकदा वापरकर्त्याला कोणताही विचार न करता तातडीने लिंकवर क्लिक करण्यास भाग पाडणे हा असतो. WhatsApp, SMS, ई-मेल किंवा सोशल मीडियावर आलेल्या कोणत्याही ऑफरवर क्लिक करण्यापूर्वी लिंक काळजीपूर्वक तपासा. वेबसाइटच्या नावात स्पेलिंगची चूक, विचित्र URL, अनोळखी अटॅचमेंट किंवा वैयक्तिक व बँकिंग माहिती मागणारे मेसेज आल्यास सावध राहा. काही फेक शॉपिंग वेबसाइट्स अगदी मूळ वेबसाइटसारख्याच दिसू शकतात. त्यामुळे मेसेजमधील लिंकवर क्लिक करून शॉपिंग करण्याऐवजी अधिकृत वेबसाइट किंवा ॲप स्वतः उघडा आणि तेथे ऑफरची खात्री करा.

सणासुदीच्या काळात UPI व्यवहार वाढत असल्याने UPI फसवणुकीचा धोकाही वाढू शकतो. सायबर ठग रिफंड, कॅशबॅक किंवा इनाम मिळणार असल्याचे सांगून तुमच्याकडून पेमेंट अप्रूव्ह करण्यास किंवा QR कोड स्कॅन करण्यास सांगू शकतात. लक्षात ठेवा, UPI द्वारे पैसे प्राप्त करण्यासाठी UPI PIN टाकण्याची गरज नसते. एखादी व्यक्ती रिफंड किंवा इनामाच्या नावाखाली QR कोड स्कॅन करण्यास किंवा कलेक्ट रिक्वेस्ट स्वीकारण्यास सांगत असेल, तर सावध व्हा.

सणासुदीच्या काळात लिंक अधिकृत आहे याची खात्री केल्याशिवाय कोणताही व्यवहार करू नका. विशेषतः OTP, UPI PIN आणि बँकिंग पासवर्ड कोणालाही देऊ नका.

# स्वातंत्र्यसैनिक गोदावरी परुळेकर

गोदावरी शामराव परुळेकर यांचा स्मृतिदिन आहे. त्यांचा जन्म १४ ऑगस्ट १९०८ रोजी झाला. या भारतीय स्वातंत्र्यसैनिक, लेखिका होत्या.

प्रसिद्ध वकील असलेल्या वडिलांनी आपल्या या लेकीला वैचारिक स्वातंत्र्य दिले तसेच कृती करण्यासाठी पाठबळही पुरवले. त्यांच्या घरात आधुनिक वातावरण होते. बीएएलएलबी झालेल्या गोदावरीबाई कामगार चळवळीत सामील झाल्या. याच काळात साम्यवादी कार्यकर्ते शामराव परुळेकर यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या. त्यानंतर त्यांना कामगारांच्या विविध प्रश्नांची माहिती झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात त्यांना वरचेवर तुरुंगवासात दिवस काढावे लागले. युद्ध संपल्यानंतर त्या वारली शेतकऱ्यांशी जोडल्या गेल्या. त्या शेतकऱ्यांची वेठबिगारीत दखल घेतली जात नव्हती आणि समाजात त्यांना प्रतिष्ठाही नव्हती. त्यांची सामाजिक उन्नती व्हावी यासाठी वारली शेतकऱ्यांच्या संघर्षाचा त्या एक भाग बनल्या.

१९१२मध्ये ना.म. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गोदावरी परुळेकर यांनी मानद साहाय्यक सचिव म्हणून कामगारांच्या शिक्षणप्रसाराच्या कामात मोलाची भूमिका पार पाडली. गिरगावपासून परळपर्यंतच्या भागात ठिकठिकाणी नागरिकांना वर्तमानपत्रे वाचण्यासाठी केंद्रे सुरू केली. त्यामुळे



## निमित्त

लोकांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली व त्यांना शिक्षणाची गरज वाटू लागली. याच सुमारास १९१७ मध्ये चिंचपोकळी येथे वाचनालय सुरू केले. त्यावेळी त्यांची ११ मोफत ग्रंथालये व १० मोफत वाचनालये मोफत चालू होती.

१९४५च्या सुमारास महाराष्ट्र प्रांतिक सभेच्या कामानिमित्त परुळेकर दांपत्य ठाणे जिल्ह्यातील आदिवासी वस्तीच्या डहाणू, तलासरी गावात फिरत असताना तेथील आदिवासींचे गुलामगिरीचे भीषण जीवन पाहून तेथेच काम करायचे त्यांनी ठरवले. त्यांच्याबरोबर काम करताना त्यांच्या शोषणाविरुद्ध सावकार, जमीनदारांविरुद्ध संघर्ष उभारताना आलेले अनुभव या लढ्याची कहाणी, 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकात गोदावरीबाईंनी चित्रबद्ध केली. 'जेव्हा माणूस जागा होतो' या समाजशास्त्रीय ग्रंथातून त्यांनी जमीनदारांकडे पिढ्यानपिढ्या वेठबिगारीने काम करणार्या आदिवासी स्त्री पुरुषांचे केलेले भयानक चित्रण अंगावर शहारे आणणारे आहे. आदिवासी समाजाला आपल्या हक्काची जाणीव करून दिल्यावर, माणूस कसा जागा झाला यावर हा ग्रंथ बेतलेला आहे. यातील 'वेठबिगारी गाडून टाकली' या प्रकरणातून आदिवासींच्या कोंडलेल्या भावना जागृत होऊन त्यांच्यात नवचैतन्य कसे निर्माण झाले याचे वर्णन केले आहे.

गोदावरीताईंनी वारली समाजातील स्त्रियांवर होणारे अत्याचार पाहिले. स्त्रियांवरील या अत्याचाराविरुद्ध लढण्याचा निर्णय गोदावरीताईंनी घेतला, परंतु स्त्रियांमध्ये बदल घडवून आणण्याच्या कामात त्यांना अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही. कारण त्यांच्या लक्षात आले की, वारली आदिवासींच्या कल्पना, आदर्श कृती यामध्ये सुधारणा घडवून आणण्यास शिक्षणाशिवाय अन्य पर्याय नाही. तेव्हा त्यांच्या शिक्षणासाठीच काम करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्याचबरोबर सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी त्यांना लढण्याचे बळही गोदावरीताईंनी दिले. त्यासाठी राजकारणाचे प्राथमिक धडेही त्यांनी शिकवले. गोदावरीताईंनी ८ ऑक्टोबर १९९६ रोजी या जगाचा निरोप घेतला. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## पाइल्सच्या त्रासावर वेदना कमी करणारा उपाय

मूळव्याध म्हणजेच पाइल्स ही एक गंभीर आणि असह्य वेदना देणारी समस्या आहे. जी आपल्या काही चुकांमुळे होते. हे नाजूक जागेचं दुखणं इतकं वाईट असतं की, ना नीट बसता येत ना उभं राहता येत. पाइल्स झाल्यावर टॉयलेट करताना भयानक वेदना होतात, विष्ठेतून रक्त येतं. गुदद्वारात सूज येत, फोड येतात. ज्यामुळे संडास करताना खूप वेदना होतात. या सूजेचं कारण म्हणजे जास्त वेळ एकाच जागी बसून राहणं, पोट साफ न होणं, जास्त ताण देणं, गर्भधारणा किंवा पेल्विक भागावर वाढलेला दाब. पाइल्स झाल्यावर वेदना इतक्या वाढतात की, त्या कमी करण्यासाठी लोक वेगवेगळे उपाय शोधत असतात. अशात आज आपण असाच एक उपाय घेऊन आलो आहोत.



नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ (एनएचआय)च्या आकडेवारीनुसार अमेरिकेत पाइल्स हा चौथा सर्वात सामान्य गॅस्ट्रोइंटेस्टाइनल आजार आहे. दरवर्षी साधारण ३.३ दशलक्ष लोक यामुळे त्रस्त असतात. भारतातही ही समस्या खूप सामान्य आहे. अंदाजे ५०% लोकांना आयुष्यात कधी ना कधी पाइल्स होऊ शकतो.

पाइल्स होण्याची मुख्य कारणे सतत पोट बिघडणे, एकाच स्थितीत जास्त वेळ बसणे, जास्त वेळ उभे राहणे, लठ्ठपणा, अधिक मद्यसेवन, नैसर्गिक विधीसाठी जोर लावावा लागणे, फायबरची कमतरता, अनुवंशिक अशी अनेक आहेत.

जर पाइल्समुळे वेदना वाढल्या असतील आणि काहीतरी लगेच आराम देणारा उपाय हवा असेल, तर स्टॅनफोर्ड आणि यूएसएलएमध्ये प्रशिक्षित गॅस्ट्रोएंटेरोलॉजिस्ट डॉ. वेंडी यांनी सांगितलेला पाच मिनिटांचा उपाय खूप लोकप्रिय झाला आहे.

डॉ. वेंडी सांगतात की, जेव्हा गुदद्वारात सूज येते, तेव्हा पाय पाच मिनिटांसाठी वर उचलून ठेवणं हा एक इन्स्टन्ट आणि सोपा उपाय आहे. यासाठी त्यांनी एक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यात आपण उपाय बघू शकता.

डॉ. वेंडी सांगतात की, कंबर आणि पाय वर केल्यानं गुदद्वारातील नसांवरील दाब कमी होतो आणि रक्तप्रवाह गुरुत्वाकर्षणाच्या मदतीने हृदयाकडे परत जातो. यामुळे गुदभागातील ताण आणि सूज कमी होते आणि काही मिनिटांतच वेदनांपासून आराम मिळतो.

# नागोठण्याच्या पाणीपुरवठा योजनेला मिळाली प्रशासकीय गती

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील नागरिकांच्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या शुद्ध पाणीपुरवठ्याच्या प्रश्नाला आता ठोस प्रशासकीय दिशा मिळाली असून रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या पुढाकाराने सोमवारी मंत्रालयात या योजनेबाबत उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नवीन मंत्रालयीन इमारतीत बैठक झाली. अपर मुख्य सचिव पराग जैन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस पाणीपुरवठा विभागासह संबंधित विविध विभागांचे उच्चस्तरीय अधिकारी उपस्थित होते.



नागोठणे ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोर जैन, भाई टके, सरपंच सुप्रिया महाडिक, राष्ट्रवादी शहराध्यक्ष बाळासाहेब टके, ग्रामपंचायत सदस्य अकलाख पानसरे, सदस्या भाविका गिजे, विनिता पाटील, राष्ट्रवादीचे युवा नेतृत्व मनोज टके, धनंजय जगताप, केतन भोय आदी उपस्थित होते.एका महत्त्वाच्या बैठकीमुळे खासदार सुनील तटकरे हे मंत्रालयातील बैठकीस प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत, मात्र त्यांनी मोबाईल कॉन्फरन्सद्वारे बैठकीत सहभाग घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. त्यामुळे नागोठणेच्या शुद्ध पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन स्तरावर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीत नागोठणे पाणीपुरवठा योजना रायगड जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या देखरेखीखाली राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. योजनेसाठी आवश्यक असलेला संपूर्ण नवीन प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत तयार करण्यात येणार आहे.या नवीन प्रस्तावासाठी नागोठणे ग्रामपंचायतीचा आवश्यक ठराव घेण्यात येणार असून, पाणीपुरवठा योजनेचा वीज खर्च कमी करण्याच्या दृष्टीने जॅकवेलजवळ तसेच फिल्टर प्लांटजवळ अशा दोन ठिकाणी सोलर सिस्टीम बसविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे योजनेच्या भविष्यातील वीज खर्चात बचत होणार आहे. योजनेचा संपूर्ण, परिपूर्ण आणि तांत्रिकदृष्ट्या आवश्यक प्रस्ताव जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत तयार करून अपर मुख्य सचिव पराग जैन यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येणार आहे. ग्रामपंचायतीचा ठराव घेऊन प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

खासदार सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार नागोठणे शुद्ध पाणीपुरवठा योजनेसाठी वाढीव निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ढोबळ अंदाजपत्रक न देता योग्य पद्धतीने व तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण अंदाजपत्रक तात्काळ सादर करावे. त्यानंतर आवश्यक त्या निधीस तत्काळ मंजुरी देण्यात येईल, असे आश्वासन अपर मुख्य सचिव पराग जैन यांनी किशोर जैन व भाई टके यांना दिले. नागोठणेकरांच्या दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या शुद्ध पाणीपुरवठ्याच्या प्रश्नाला खासदार सुनील तटकरे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे आता ठोस प्रशासकीय दिशा मिळाल्याने ग्रामस्थांकडून त्यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत. तसेच नागोठणेला शुद्ध पाणी मिळावे यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे किशोर जैन व भाई टके यांचेही नागोठणेकरांकडून आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

# पाझर तलावात बुडून दोन चिमुकलींचा मृत्यू

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-रेवस मार्गावरील नवगाव परिसरातील रामधरनेश्वर पाझर तलावात बुडून दोन चिमुकल्या मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आशिका नितीन पवार (व३) आणि संजना संदीप पवार (८) अशी मृत मुलींची नावे आहेत. सोमवारी सायंकाळी घडलेल्या या घटनेमुळे रामधरनेश्वर आदिवासी वाडी तसेच नवगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार आशिका पवार, संजना पवार आणि त्यांची मैत्रीण माई राजू वाघमारे या तिघी खेळत असताना पाझर तलावाच्या परिसरात गेल्या होत्या. खेळता खेळता आशिका आणि संजना या दोघी पाण्यात बुडाल्या. हा प्रकार लक्षात येताच माई वाघमारे हिने तातडीने वाडीवर धाव घेत नागरिकांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच वाडीतील नागरिकांनी तलावाकडे धाव घेत दोन्ही मुलींना पाण्यातून बाहेर काढले. त्यानंतर त्यांना तातडीने अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास दोघींनाही मृत घोषित केले.

दोन्ही मुली तलावापासून काही अंतरावर असलेल्या आदिवासी वाडीत राहत होत्या. त्यांच्या दुर्दैवी मृत्यूची बातमी समजताच कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे. दरम्यान, याच पाझर तलावात काही महिन्यांपूर्वी २४ वर्षीय तरुणाचा पोहताना बुडून मृत्यू झाला होता. त्यामुळे या तलावाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. तलाव परिसरात सुरक्षिततेच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

# खोपोलीत नवजात मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली येथील सुमित्राराज हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आणलेल्या अवघ्या १० दिवसांच्या नवजात मुलीचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेनंतर मुलीच्या कुटुंबीयांकडून उपचार पद्धतीबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत असून नातेवाइकांनी रुग्णालयाची तोडफोड करून कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याचा आरोप डॉ. केजरीवाल दाम्पत्याने केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मंगळवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास शाहिस्ता मुस्तफा जळगावकर यांना सिझेरियन प्रसूतीनंतरचे टाके काढण्यासाठी रुग्णालयात आणण्यात आले होते. त्यावेळी तिच्या १० दिवसांच्या मुलीचीही डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली. मुलीला कावीळ असण्याची शक्यता डॉक्टरांनी व्यक्त केल्याचे आईचे म्हणणे आहे. डॉक्टरांनी मुलीला डीओपी नावाचे औषध पाजल्याचे आईने सांगितले. त्यानंतर मुलगी अधिक पिवळी पडली आणि नाकातून रक्तस्राव सुरू होऊन प्रकृती बिघडत गेल्याचा दावा कुटुंबीयांनी केला आहे. मुलीला रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

या प्रकरणात डॉक्टरांकडून नेमके कोणते उपचार करण्यात आले, कोणते औषध देण्यात आले आणि मृत्यूचे वैद्यकीय कारण काय आहे, याबाबत अधिकृत माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. मुलीच्या मृत्यूची वैद्यकीय कारणमीमांसा, उपचाराची नोंद आणि आवश्यक असल्यास वैद्यकीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी कुटुंबीयांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच खोपोली पोलीस घटनास्थळी दाखल झाले. तोडफोड करणाऱ्या नातेवाइकांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी डॉ. केजरीवाल यांनी केली आहे.

## थळ येथील तलाठ्यासह कोतवाल एसीबीच्या जाळ्यात

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील थळ येथील तलाठी आणि कोतवाल यांना रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी लाच घेताना रंगेहाथ पकडले. या कारवाईने लाचखोरांना दणका बसला आहे. मिळालेल्या माहितीनुसार थळ येथील तलाठी कार्यालयात तक्रारदाराने जमीन वर्ग दोनवरून एक करण्यासाठी अर्ज केला होता. ही नोंद करण्यासाठी तलाठ्याने तक्रारदाराकडून एक हजार रुपयांची लाच मागितली होती.

त्यामध्ये कोतवालाचाही सहभाग असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सांगण्यात आले. तक्रारीनुसार रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या उपअधीक्षक सरिता भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचण्यात आला. अखेर मंगळवारी थळमधील तलाठी कार्यालयात तलाठी अमृत चौगुले यांना एक हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले.

# कर्जतमध्ये सेवा संकल्प अभियानांतर्गत जनजागृती

**कर्जत : प्रतिनिधी**

सेवा संकल्प अभियानांतर्गत महिला व बालविकासविषयक जनजागृती कार्यक्रम जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळा, भालिवडी, ता. कर्जत येथे संपन्न झाला.



यावेळी कौटुंबिक हिंसाचार कायदा, बालसंगोपन योजना, अनाथ प्रमाणपत्र, हुंडा प्रतिबंधक कायदा तसेच महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व प्रकल्पांची विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली.

या उपक्रमात सुमारे ५५० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. कार्यक्रमास आदिवासी विभागाच्या प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, जिल्हा सल्लागार समिती सदस्य वैशाली पाटील, संशोधन अधिकारी सुप्रिया चव्हाण, जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अविनाश बदे, चाईल्ड हेल्पलाईनच्या निलाक्षी दगडे, कर्जत तालुका सहाय्यक संरक्षण अधिकारी अस्मिता खंडागळे, पेण प्रकल्पांतर्गत बचत गट, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. या उपक्रमास विद्यार्थिनींचा चांगला प्रतिसाद लाभला.


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड पनवेल ४१० २०६

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३

Email: panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/सा.प्र.वि/२१-२६/प्र.क्र २३/३२५/२०२६ दिनांक : ०७/१०/२०२६

### जाहिर निविदा सुचना (सुधारित)

**आपल्या देशाचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरी करकीर्दीला २५ वर्षे पुर्ण झाल्यानिमित्त त्यांच्या सेवा कार्याचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने त्यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत राज्यात "सेवा संकल्प अभियान"** राबविण्याबाबत खालील नमुद उपक्रमांचे आयोजन करणेकरीता ठेकेदाराची / संस्थेची नियुक्ती करणे कामी इच्छूक संस्था/पुरवठा धारक यांचे कडून रोजी खालील नमुद केलेल्या तपशिला नुसार दर पत्रके मागविणेंत येत आहे. सदरचे कार्यक्रम दि. १५/१०/२०२६ रोजी आयोजित करण्याचे आहेत.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप |
|---|---|
| १ | ७ स्टॉल उभारणी व व्यवस्थापन |
| २ | चित्रकला व निबंध स्पर्धा आयोजन (नागरीकांसाठी) |
| ३ | रांगोळी स्पर्धा आयोजन (नागरीकांसाठी) |
| ४ | बाईक रॅली आयोजन (नागरीकांसाठी) |
| ५ | व्याख्याने |

तरी वरील उपक्रमांतील सविस्तर माहिती व कामाच्या अटी शर्ती सामान्य प्रशासन विभागात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करण्यात येतील, तसेच इच्छुकांनी सदरची दरपत्रके दि. ११/१०/२०२६ (रविवार) ऐवजी **दि. १२/१०/२०२६ (सोमवार) दुपारी ३.३० वाजे पर्यंत** महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावीत. प्राप्त झालेली दरपत्रके त्याच दिवशी दुपारी ३.४५ वाजता मा. उपायुक्त (मुख्यालय) यांचे दालनात उघडण्यात येतील. या कामाच्या बाबत अधिक माहितीसाठी सामान्य प्रशासन विभागाशी संपर्क साधावा.

**सही/-**
**( बाळाराम रातांबे)**
**सहा. आयुक्त (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका**


# माणगावात शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सव

**माणगाव : बातमीदार**

अखंड हिंदुस्थानचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे अफजलखान वधावेळी जवळचे अंगरक्षक म्हणून शौर्य गाजविणारे शिवरत्न वीर जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त माणगाव नाभिक समाज शहर संघटनेच्या वतीने शुक्रवारी (दि. ९) माणगाव शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जयंती उत्सवानिमित्त सकाळी ११ वाजता दीप प्रज्वलन, प्रतिमापूजन व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करण्यात येणार आहे.



त्यानंतर दुपारी १२ ते १ या वेळेत शिवव्याख्याते प्रसाद जाधव यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारी १ ते २ या वेळेत भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. दुपारी ३ वाजता छत्रपती शिवाजी महाराज व शिवरत्न वीर जिवाजी महाले यांच्या प्रतिमांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून या मिरवणुकीत ढोल-ताशा पथक आणि पेपर ब्लास्टर हे विशेष आकर्षण ठरणार आहे. रात्री ८ वाजता भोजनाचा कार्यक्रम होणार आहे.

माणगाव नाभिक समाज शहर संघटनेचे अध्यक्ष दिपेश जाधव, उपाध्यक्ष अभिषेक खंडागळे, कार्याध्यक्ष प्रतिक भोसले, सचिव अजित हुजरे व खजिनदार समीर मोहिते यांच्यासह संस्थापक भाऊ पांडे, तालुका अध्यक्ष सौरभ पांडे, माजी अध्यक्ष प्रदीप कदम, सल्लागार जयंत शिंदे, कांता हुजरे, दिलीप जाधव आणि पदाधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शिवरत्न जिवाजी महाले जयंती उत्सवाचे यंदाचे पाचवे वर्ष असून खरे मंगल कार्यालय, ब्राह्मणोळी रोड, माणगाव येथे हा उत्सव पार पडणार आहे. समाजबांधवांसह माणगावकर शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## थकबाकीदारांसाठी एकरकमी परतावा योजना

**अलिबाग :** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची उपकंपनी शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळामार्फत विविध कर्ज योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यातील इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी अल्पव्याजदराने कर्ज वितरित करण्यात आले आहे.

महामंडळाने संपूर्ण थकीत कर्ज रकमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यास थकीत व्याज रकमेत ५० टक्के सवलत देण्याबाबतची एकरकमी परतावा योजना ३१ मार्च २०२७पर्यंत राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक गंगाधर डोईफोडे यांनी केले आहे.

# महिलेचा वेश धारण करून वॉचमनची हत्या; आरोपीला जन्मठेप

**माणगाव : बातमीदार**

महाड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दासगाव येथे १५ फेब्रुवारी २०२० रोजी झालेल्या खून प्रकरणात आरोपी मयुरेश गोपीचंद पड्याळ याला माणगाव येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. तसेच पाच हजार रुपये दंडही ठोठावण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार आरोपी मयुरेश पड्याळ हा दासगाव येथील कंट्री लिकर बारमध्ये दारू पिण्यासाठी गेला होता. यावेळी बारच्या मॅनेजरसोबत त्याचा वाद झाला. बारमधील वॉचमन दिलीप दगडू साळवी यांनी मध्यस्थी करून वाद मिटविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आरोपीने त्यांना शिवीगाळ करून दमदाटी केली.

बार बंद झाल्यानंतर आरोपीने रागाच्या भरात महिलेचा वेश परिधान करून सोबत आणलेल्या चाकूने दिलीप साळवी यांच्या गळ्यावर वार करून त्यांचा खून केला. या घटनेची फिर्याद दाखल करून भारतीय दंड विधान संहिता कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. या गुन्ह्याचा तपास महाड शहर पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक एस. डी. सणस यांनी केला. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. माणगाव येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात या खटल्याची सुनावणी झाली. खटल्यामध्ये फिर्यादीची साक्ष, घटनास्थळाजवळील सीसीटीव्ही फुटेज तसेच वैद्यकीय पुरावा महत्त्वाचा ठरला.

उपलब्ध पुराव्यांच्या आधारे अतिरिक्त सत्र न्यायाधीश मुकेश पाटील यांनी आरोपी मयुरेश गोपीचंद पड्याळ याला दोषी ठरविले. त्यानंतर ६ ऑक्टोबर रोजी कलम ३०२ अन्वये आरोपीला जन्मठेप आणि पाच हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली. या खटल्यात अतिरिक्त सरकारी वकील ॲड. योगेश तेंडुलकर यांनी सरकार पक्षातर्फे काम पाहिले.


## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ३६/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | रानसई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती..... रानसई जलशुद्धीकरण केंद्र येथे एसव्हीजी पॅनेलचा पुरवठा करून बसविणे. | ₹ ३९,०४,९५४.०० |
| २ | महाड औद्योगिक क्षेत्रातील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरुस्ती ... महाड औद्योगिक क्षेत्रातील सी.एफ.सी. इमारतीतील विद्यमान संरचनांवरील वेदर शेडची UPVC रूफिंग शीट व एम.एस. आधार संरचना वापरून **दुरुस्ती करणे तसेच महाड औद्योगिक क्षेत्रातील मऔवि महामंडळाच्या कार्यालयाच्या आवारातील पार्किंग** शेडची दुरुस्ती करणे. | ₹ २६,८२,४७०.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र **दिनांक** ०९/१०/२०२६ ते दिनांक २३/१०/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील **कामांबाबत दिनांक** १४/१०/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर **नोंदवावेत.** कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा **दिनांक** १६/१०/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# नवी मुंबई विमानतळाची कनेक्टिव्हिटी वाढली

## थेट बससेवा सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची मुंबई, पुणे आणि नाशिकसह प्रादेशिक कनेक्टिव्हिटी वाढली असून दादर, सीएसएमटी, बोरिवली आणि पुण्यासाठी एसटी महामंडळाच्या थेट बससेवा सुरू करण्यात आल्या आहेत. या सेवांमुळे मुंबई महानगर प्रदेश तसेच महाराष्ट्रातील प्रवाशांना विमानतळासाठी थेट सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होणार आहे.



महाराष्ट्र शासनाचे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते दादर एसटी बस स्थानकावर या बससेवेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी एनएमआयएएल आणि एसटी महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. विमानतळावर दाखल झालेल्या बसचे डिपार्चर फोरकोर्टवर स्वागत करण्यात आले. पहिल्या टप्प्यात दादर आणि सीएसएमटी मार्गावर दररोज १६, बोरिवलीसाठी आठ व पुण्यासाठी दोन फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. या सेवांसाठी अटल सेतूसह प्रमुख मार्गांचा वापर केला जाणार आहे. विमानतळ–सीएसएमटी–दादर बससेवा उलवे, न्हावाशेवा–चिर्ले, अटल सेतू, सेव्हरी, ईस्टर्न फ्रीवे, भायखळा, परळ व लालबाग अशी असणार आहे.

बोरिवली बससेवा अटल सेतू, ईस्टर्न फ्रीवे, ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, सायन, मुंबई विमानतळ टर्मिनल १, जेवीएलआर, अंधेरी व वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे मार्गे असणार आहे. तर पुणे ही बस स्वारगेटपर्यंत थेट जाणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ते बोरिवली मार्गाचे बसभाडे २१० रुपये, विमानतळ ते दादर मार्गाचे बसभाडे १७० रुपये, तर विमानतळ ते पुणे (स्वारगेट) मार्गाचे बसभाडे ४५५ रुपये असेल. बससेवांमुळे नवी मुंबई, मुंबई महानगर प्रदेश, पुणे, कोकण व महाराष्ट्रातील प्रवाशांसाठी विमानतळ अधिक सुलभ, परवडणारे होईल. विमानतळाला एसटीच्या व्यापक वाहतूक नेटवर्कशी जोडल्यामुळे नागरिकांना नव्या विमान वाहतूक केंद्रापर्यंत सुरक्षित, विश्वासार्ह व किफायतशीर प्रवासाची सुविधा मिळेल, असे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

बोरिवली, दादर, सीएसएमटी व पुणे येथून थेट बससेवा उपलब्ध झाल्यामुळे विमानतळाची लास्ट माईल कनेक्टिव्हिटी मजबूत होणार आहे. मुंबईच्या पश्चिम व पूर्व उपनगरांसह मध्य व दक्षिण मुंबई तसेच नवी मुंबईतील प्रवाशांसाठी सेवा किफायतशीर व सुलभ प्रवासाचा पर्याय ठरणार आहे. यामुळे विमानतळाची मुंबई महानगर प्रदेश व आसपासच्या शहरांशी कनेक्टिव्हिटी वाढणार असून प्रवाशांना सुविधा प्राप्त होणार आहे, असे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे मुख्य विमानतळ अधिकारी सुभाष मुरिकेंचेरी यांनी सांगितले.

# गव्हाण विद्यालयात पालकांकडून प्रथमोपचार साहित्य भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण–कोपर येथे दहावीच्या पालकांकडून विद्यालयास प्रथमोपचार साहित्य भेट देण्यात आले. शैक्षणिक संस्थेप्रति सामाजिक बांधिलकीचे हे आदर्श उदाहरण ठरले. पाल्य जेथे शिकतो त्या विद्यालयाच्या प्रगतीत पालक म्हणून आपलेही योगदान असावे या भावनेतून गव्हाण विद्यालयातील पालक विविध उपक्रमांना सहकार्य करीत असतात.



विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रथमोपचार साहित्याची गरज लक्षात घेऊन दहावी ब मध्ये शिक्षण घेणारी जीविका कोळीचे पालक शशिकांत कोळी व दर्शना कोळी यांनी विद्यालयास प्रथमोपचार साहित्य देण्याचा स्तुत्य उपक्रम केला. मंगळवारी (दि. ६) जीविकाच्या आई दर्शना कोळी यांनी प्रथमोपचार साहित्य सुपूर्द केले. यात अँटिसेप्टिक क्रीम, डेटॉल, बँडेज पट्ट्या आदींचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाल्यास तातडीने प्राथमिक उपचार मिळावेत या उद्देशाने देण्यात आलेली ही भेट उपयुक्त ठरणार आहे.

यावेळी प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, दहावीच्या वर्गशिक्षिका गीतांजली म्हात्रे उपस्थित होत्या. विद्यालयाच्या वतीने कोळी कुटुंबीयांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# नवी मुंबईत पाणीपुरवठ्याची अत्यावश्यक कामे सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाच्या वतीने ६ ऑक्टोबर रोजी भोकरपाडा जलशुद्धिकरण केंद्र तसेच सीबीडी सेक्टर ७ मोरबे मुख्य जलवाहिनी त्याचप्रमाणे वाशी अरेंजा सर्कल आणि महापे या ठिकाणी एकाच वेळी अत्यंत गरजेची कामे हाती घेण्यात आली असून आयुक्त कैलास शिंदे यांच्यामार्फत या कामांचा सातत्याने आढावा घेतला जात आहे.



सदरची कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत. त्यानुसार सर्व यंत्रणा ऑन फिल्ड कार्यान्वित असून नॉनस्टॉप काम करण्यात येत आहे. कामे वेळेत पूर्ण होतील याकडे काटेकोर लक्ष दिले जात आहे. तरी नागरिकांनी या कालावधीत संपूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# शिक्षण प्रसारक विद्यालयात आजी-आजोबा गौरव सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

एनआरबी एज्युकेशनल सोशल अँड कल्चरल संस्थेच्या वतीने संचालित शिक्षण प्रसारक प्राथमिक विद्यालयात ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान आणि आजी–आजोबा गौरव कार्यक्रम उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. ३ ऑक्टोबर रोजी आयोजित कार्यक्रमाला आजी–आजोबा तसेच पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी सिडको संचालक व माजी नगरसेवक नामदेव भगत यांच्या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक शेखर जगताप आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वंदना पाटील यांच्यासह शिक्षकवृंदांनी उपस्थित आजी–आजोबांचे स्वागत व सत्कार केला. कार्यक्रमात उपस्थित आजी–आजोबांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. काही ज्येष्ठांनी गाणी व पारंपरिक ओव्या सादर केल्या, तर काही आजी–आजोबांनी नातवंडांसोबत मंचावर नृत्य करत रंगत आणली. नातवंडे व आजी–आजोबांमधील प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकीचे दर्शन घडविणाऱ्या या क्षणांनी उपस्थितांना भावूक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निराशा मोकल यांनी केले. यावेळी वृषाली परदेशी यांनी मनोगत व्यक्त करताना कुटुंब व समाजाच्या जडणघडणीत आजी–आजोबांचे असलेले महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुगंधा घुले, सुनंदा नौकुडकर, काळुराम जाधव, कमल पुकळे, खुशी खोत तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नवी मुंबई करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा रंगणार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या सांस्कृतिक क्षेत्राला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने तसेच रंगभूमीची समृद्ध परंपरा आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी नवी मुंबई करंडक २०२६ राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्यातील रंगकर्मी, नाट्यसंस्था आणि कलावंतांच्या सहभागातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.



मराठी रंगभूमी व चित्रपटसृष्टीतील आपल्या अभिनयाने रसिकांच्या मनावर कायमस्वरूपी ठसा उमटविणारे अभिनेते कै. विजय कदम आणि कै. प्रदीप पटवर्धन या दोन ज्येष्ठ कलाकारांच्या कलास्मृतींना उजाळा देण्याचे कार्यही स्पर्धेच्या माध्यमातून केले जाणार आहे.

स्पर्धेची प्राथमिक फेरी २४ ऑक्टोबर व २५ ऑक्टोबर रोजी होणार असून प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम तारीख १० ऑक्टोबरपर्यंत आहे. प्राथमिक फेरीनंतर अंतिम फेरीचे आयोजन कै. विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी, नवी मुंबई येथे होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. प्रथम, द्वितीय, तृतीय व दोन उत्तेजनार्थ त्यासोबत सर्वोत्कृष्ट अभिनेता, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट लेखक तसेच विविध तांत्रिक विभागातील कलाकारांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी पारितोषिके देण्यात येणार आहेत.

विजेत्या एकांकिकेला मानाचा नवी मुंबई करंडक प्रदान करण्यात येणार असून विविध वैयक्तिक पुरस्कारांनीही गौरव करण्यात येणार आहे. नवी मुंबई करंडक २०२६ च्या झालेल्या बैठकीत हरि पवळे, सुनील पगार, रंगराव घागरे, मदन मुकादम, दत्ता करे, मिलिंद बनसोडे, सचिन पाटील, प्रशांत जोशी, विलास चव्हाण, सिद्धार्थ ठोकळे, शशी तुपे, रवी मोरे, रवी पाटील उपस्थित होते.

# कुत्र्याच्या मृत्यूच्या रागातून तरुणाला मारहाण; गुन्हा दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**

रस्त्यावरील अपघातात कुत्र्याचा मृत्यू झाल्याच्या कारणावरून झालेल्या वादात तरुणाला व त्याच्या भावाला शिवीगाळ करून लोखंडी कड्याने मारहाण आणि दाताने चावा घेऊन जखमी केल्याची घटना उलवे सेक्टर–२६ येथे घडली आहे. याप्रकरणी मोहम्मद युसुफ शेख (४०) याच्याविरोधात उलवे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

४ ऑक्टोबर रोजी रात्री रिद्धी–सिद्धी अपार्टमेंटसमोर कुत्र्याचा अपघाती मृत्यू झाल्याच्या कारणावरून शेख याने गोविंद मुलचंद चव्हाण (३५) व त्यांच्या भावाशी वाद घातला. वाद वाढल्यानंतर आरोपीने शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर लोखंडी कड्याने चव्हाण यांच्या डोक्यावर मारहाण केली.

# नवी मुंबई महापालिकेचे तिशीचा पल्ला अभियान सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत ३० वर्षांवरील नागरिकांच्या उत्तम आरोग्यासाठी आणि असंसर्गजन्य आजारांच्या वेळेत निदानासाठी तिशीचा पल्ला –तपासणी अन् सल्ला हे विशेष आरोग्य अभियान राबवले जात आहे. हे अभियान १ सप्टेंबरपासून १० डिसेंबर या कालावधीत संपूर्ण नवी मुंबई महापालिका क्षेत्रात प्रभावीपणे राबविले जात आहे.

विशेष मोहिमेंतर्गत वाढत्या वयासोबत उद्भवणाऱ्या विविध गंभीर आजारांचे लवकर निदान करून त्यावर वेळेवर उपचार करणे हा मुख्य उद्देश आहे. यामध्ये नागरिकांची प्राथमिक तपासणी थेट त्यांच्या घरी जाऊन आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत केली जाणार आहे. अभियानांतर्गत केल्या जाणाऱ्या प्रमुख आरोग्य तपासण्या अशा आहेत. रक्तातील साखरेचे प्रमाण मोजून मधुमेहाचे वेळेत निदान करणे, रक्तदाबाची नियमित तपासणी करून हृदयविकाराचा धोका टाळणे, तंबाखू, गुटखा किंवा इतर कारणांमुळे होणाऱ्या तोंडाच्या कर्करोगाची प्राथमिक तपासणी करणे, महिलांमधील गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे वेळीच निदान करणे आणि महिलांमध्ये वाढत्या स्तनांच्या कर्करोगाची सुरुवातीच्या टप्प्यात तपासणी करणे. वरीलप्रमाणे महत्त्वाच्या आरोग्य तपासण्या करून लवकर तपासणी, योग्य निदान, वेळेवर उपचार या त्रिसूत्रीनुसार नवी मुंबईतील तिशीच्या पुढील नागरिकांच्या आरोग्याविषयी जागरूकता राखत हे विशेष आरोग्य अभियान महानगरपालिकेच्या वतीने राबविले जात आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३० वर्षांवरील सर्व स्त्री व पुरुष नागरिकांनी आपल्या घरी या कामी भेट देणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना तपासणीकामी पूर्ण सहकार्य करावे आणि प्राथमिक तपासणीनंतर पुढील सल्ल्यासाठी व आवश्यक उपचारांसाठी आपल्या जवळच्या महापालिका नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सारनाथ विहारात वर्षावास प्रवचन मालिका



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

सारनाथ बुद्ध विहार कमिटीच्या वतीने आयोजित वर्षावास प्रवचन मालिका २०२६ अंतर्गत चौदाव्या पुष्पाचे आयोजन ४ ऑक्टोबर रोजी सारनाथ बुद्ध विहार येथे करण्यात आले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर बोधिसत्त्व कसे या विषयावर प्रतिभा आहिरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सल्लागारस्थानी भिकाजी कांबळे होते. सूत्रसंचालन मंगेश जाधव यांनी केले.

मार्गदर्शन करताना प्रतिभा आहिरे यांनी बोधिसत्त्वाच्या दहा पारमिता यांचे महत्त्व स्पष्ट केले. बोधिसत्त्वाला या पारमिता कोणत्या कारणासाठी आणि कोणत्या प्रकारे आचरणात आणाव्या लागतात याचे त्यांनी सविस्तर विवेचन केले. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य, त्यांची समाजाप्रति असलेली बांधिलकी, वंचित आणि शोषित समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले अथक कार्य तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील बोधिसत्त्वाच्या गुणांचे दर्शन याबाबत त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील विषमता, अज्ञान आणि अन्याय दूर करण्यासाठी केलेला संघर्ष केवळ सामाजिक परिवर्तनाचा लढा नव्हता, तर तो मानवमुक्तीचा धम्ममार्ग होता, असे प्रतिपादनही यावेळी करण्यात आले. करुणा, प्रज्ञा, त्याग, शील आणि समाजहिताची भावना या बोधिसत्त्वाच्या गुणांचा डॉ. बाबासाहेबांच्या जीवनाशी असलेला संबंध त्यांनी उपस्थितांसमोर उलगडून सांगितला. वर्षावास प्रवचन मालिकेतील कार्यक्रमाला धम्मबांधव, उपासक–उपासिका तसेच परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. उपस्थितांनी प्रवचनाचा लाभ घेत धम्मविचार आत्मसात केला.

# वाशीत २.३५ लाखांचा ई-सिगारेट साठा जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशीतील मिनी सीशोअर परिसरात बेकायदेशीरपणे ई–सिगारेटची विक्री करणाऱ्या तरुणावर गुन्हे शाखेने कारवाई करत सुमारे दोन लाख ३५ हजार रुपये किमतीचा प्रतिबंधित ई–सिगारेटचा साठा जप्त केला आहे. याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे शाखा कक्ष १, वाशीच्या पथकाला सेक्टर १० ए येथील मिनी सीशोअर परिसरात प्रतिबंधित ई–सिगारेटची विक्री होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी मंगळवारी रात्री साडेआठच्या सुमारास मुन्ना मुन्नी पार्कसमोर छापा टाकला. या कारवाईत अब्दुल्ला ममतुले याच्याकडून विविध स्वादांच्या सुमारे ९४ ई–सिगारेट उपकरणांचा साठा जप्त करण्यात आला. या साठ्याची एकूण किंमत दोन लाख ३५ हजार रुपये आहे.

आरोपीविरुद्ध इलेक्ट्रॉनिक सिगारेट प्रतिबंध कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच बीएनएसएसच्या तरतुदीनुसार आरोपीला नोटीस बजावण्यात आली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शारदा देशमुख–चव्हाण करीत आहेत.

# कागदकापातून साकारले वनमंत्री गणेश नाईक यांचे व्यक्तिचित्र

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे वनमंत्री व ऐरोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार गणेश नाईक यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त त्यांचे अत्यंत सूक्ष्म, कलात्मक व वैशिष्ट्यपूर्ण कागदकाप पोर्ट्रेट त्यांना भेट म्हणून देण्यात आले. कलाकार नारायण मोतीरावे यांनी अत्यंत बारकाईने, संयमाने व विलक्षण कलाकौशल्यातून ही कलाकृती साकारली आहे. काळ्या पार्श्वभूमीवर शुभ्र कागदातून सूक्ष्म रेषांच्या साहाय्याने साकारलेले वनमंत्री गणेश नाईक यांचे व्यक्तिचित्र व त्याभोवती फुलांची कलात्मक नक्षी असलेली चौकट या कलाकृतीला एक वेगळीच सौंदर्यपूर्ण ओळख प्राप्त करून देते.



ही कलाकृती जपानी 'किरिए' या कागदकाप कला–परंपरेपासून प्रेरित असून एका कागदाच्या पृष्ठभागावर अत्यंत सूक्ष्म कापकाम, रेषांची अचूक मांडणी व प्रकाश–छायेतून व्यक्तिमत्त्व साकारण्याची ही कलाशैली आहे. कलाकृती पाहताच वनमंत्री गणेश नाईक यांनी तिच्या बारकाव्यांचे व कलात्मकतेचे कौतुक केले. इतक्या सूक्ष्म कागदकापातून स्वतःचे व्यक्तिचित्र साकारल्याचे पाहून त्यांनी आनंद व्यक्त करीत कलाकाराचे अभिनंदन केले. कलाकृतीतील प्रत्येक रेषा, फुलांची नाजूक रचना व चेहऱ्यावरील भाव यांचे बारकाईने निरीक्षण करत त्यांनी या अनोख्या कला प्रकाराबद्दल विशेष उत्सुकता व्यक्त केली.

# आंतरराष्ट्रीय श्लोक स्पर्धेत विद्याभवनचे यश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

चिन्मय मिशनद्वारे आयोजित आंतरराष्ट्रीय श्लोक स्पर्धेतील मुंबई विभाग पूर्व फेरीत पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील १८ विद्यार्थ्यांनी पारितोषिके पटकावली. शौर्यानी माने, ओवी पवार, महेश गिरी, श्लोक कुलकर्णी, शुभ्रा झनकर, तनुष पाटील, अभिराज पानसरे, प्रिन्स कांबळे, स्वरा फोफाळे, वर्निका कदम, श्रेया कलांगे, चैताली भिलारे, अस्मी कांबळे, प्रणाली कांबळे, स्वाती मिश्रा, उत्तेजनार्थ श्रिया धांद्रूत, प्राची भोसले व शिक्षिका गटातून पौर्णिमा कोकरे यांनी पारितोषिके मिळवली.



# ‘प्रकल्पग्रस्तांसाठी शासन-प्रशासन संवेदनशील’

**चौक : प्रतिनिधी**

शासन व प्रशासन दोन्ही संवेदनशील असल्याने राज्यातील प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित समस्या सुटतील, असा आशावाद पुनर्वसन प्राधिकरण (मंत्री दर्जा) आणि जनजागरण प्रतिष्ठानचे अध्यक्ष माधव भंडारी यांनी व्यक्त केला.

रायगड जिल्हा अप्पर जिल्हाधिकारी सचिन ढोले यांच्या अध्यक्षतेखाली मोरबे, हेटवणे, काळ कुंभे, कोयना प्रकल्पातील प्रलंबित असलेल्या प्रश्नांबाबत रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. त्यावेळी भंडारी बोलत होते.



यावेळी अपर जिल्हाधिकारी यांनी प्रकल्पग्रस्तांच्या भावना समजून घेऊन प्रशासनातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना या संदर्भात कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. यामध्ये सर्व पुनर्वसित वसाहतींची मोजणी करून महसुली गाव जाहीर करून स्वतंत्र, आवश्यक असल्यास ग्रामपंचायत तयार करणे, गावठाणातील प्रकल्पग्रस्तांचे भूखंडाचे अदलाबदली आदेश दुरुस्त करून, ज्यांना अद्याप भूखंड मिळाले नाहीत त्यांना भूखंड वाटप करणे तसेच सर्व भूखंडाचे सातबारा उतारे तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

गावठाणातील नागरी सुविधांचा संघटनेतील पदाधिकारी, गावठाणातील प्रमुख प्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी दौरा करून त्याबद्दलचा अहवाल एक महिन्याच्या आत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना नोकरी मिळण्यासाठी तसेच आंदोलनादरम्यान दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याबाबतीत प्रस्ताव मंत्रालय स्तरावर पाठवण्याचा व त्याचा पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला. मोरबे, हेटवणे, काळ कुंभे प्रकल्पांना लाभ क्षेत्र नसल्याने उपजीविकेसाठी त्यांना प्रकल्पाला लागून असलेली जमीन समन्याय पद्धतीने वाटप अथवा रोख रक्कम पॅकेज देण्यासाठी प्रस्ताव मंत्रालय स्तरावर पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. खालापूर व पेण तालुक्यातील कोयना प्रकल्पातील ज्या प्रकल्पग्रस्तांनी स्वतःची गावठाणे स्वतः खरेदी केलेल्या जागेत बांधली आहेत त्यांना भूखंडाचे प्रति गुंठा पाच लाख रुपये पॅकेज मागणीचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्व विषयांच्या अंमलबजावणी बाबतीत जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व माधव भंडारी यांच्या उपस्थितीत लवकरच मिटिंग आयोजित करण्यात येणार आहे.

ज्या प्रकल्पग्रस्तांनी अद्यापपर्यंत भूखंड तसेच पॅकेज मागणी केली नाही त्या सर्व प्रकल्पग्रस्तांनी आपले अर्ज जिल्हा पुनर्वसन कार्यालयाकडे जमा करण्याच्या सूचना भंडारी यांनी प्रकल्पग्रस्त तसेच प्रतिनिधी यांना दिल्या.

या बैठकीला जिल्हा पुनर्वसन कार्यालय नायब तहसीलदार वाकडे, संबंधित अधिकारी, जनजागर प्रतिष्ठानचे मार्गदर्शक व राज्य पुनर्वसन प्राधिकरण माजी निमंत्रित सदस्य माधव कुलकर्णी, राज्य समन्वयक देवराज देशमुख, कायदेशीर सल्लागार निलेश यादव, रायगड जिल्हाध्यक्ष सतीश जाधव, जगन्नाथ पाटील, सचिव योगश प्रबळकर, खजिनदार ललित उघडे, सहजिल्हा समन्वयक परशुराम मिरकुटे, गणेश ढेने, किशोर कांबळे,दिपक शिंदे, मिलिंद राणे, अंकुश वाघ, अनंत ढेने व इतर प्रकल्पग्रस्त उपस्थित होते. उपस्थितांचे आभार देवराज देशमुख यांनी मानले.

## ऑक्टोबर हीटचा कहर

**माणगाव : बातमीदार**

गत काही दिवसांपासून संपूर्ण परिसरात प्रचंड वाढलेल्या उष्णतामानाने नागरिकांचे जीवनमान विस्कळीत झाले आहे. ऑक्टोबर महिना 'हीट' असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

साधारण ढगाळ वातावरणातसुद्धा उष्णतामान आणखी वाढत असून अंगातून घामाच्या धारा वाहू लागतात. या वाढत्या उष्णतामानाचा थेट परिणाम मानवाच्या आरोग्यावर दिसून येत असून अंगदुखी, सर्दी, डोके जड होणे तसेच थंडी-तापांचे प्रकार परिसरातील लोकांना अनुभवास येत आहेत.

हवामान तज्ज्ञांच्या मते, बदलत्या हवामानाचा हा परिणाम हा हवामान बदलाच्या (क्लायमेट चेंज) दुष्परिणामांपैकी एक असू शकतो. उन्हाचा ताण, शरीरातील पाण्याची कमतरता, अनियमित झोप आणि जास्त उष्ण वातावरण यामुळे आरोग्याच्या समस्या वाढू शकतात.

वाढत्या उष्णतामानामुळे नागरिकांना घाम, थकवा आणि आरोग्याच्या समस्या जाणवत आहेत. वाढत्या उष्णतेचे आरोग्यावर परिणाम – अंगदुखी, सततची उष्णता आणि घामामुळे स्नायूंमध्ये ताण येतो, सर्दी, हवामानातील अचानक बदलाने सर्दी-खोकला होतो. डोके जड होणे, उष्णतेमुळे डोकेदुखी व थकवा जाणवतो. थंडी-ताप, शरीराची रोगप्रतिकारक क्षमता कमी होऊन ताप येऊ शकतो.

या परिस्थितीत भरपूर पाणी प्या, शरीर हायड्रेटेड ठेवा. दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडू नका.

## आराठी ग्रामपंचायत हद्दीत रस्त्याच्या बाजूला कचऱ्याचे ढीग!

**श्रीवर्धन : बातमीदार**

आराठी ग्रामपंचायत हद्दीतील श्रीवर्धन बोरली पंचतन मार्गावरती गोखले महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोरच खूप मोठ्या प्रमाणात कचरा जमा झाला होता. याबाबत वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर आराठी ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी सुरेश चौकर यांनी तातडीने दखल घेऊन, त्या ठिकाणी जेसीबी मशीन द्वारे त्या ठिकाणचा कचरा पूर्णपणे साफ करून घेतला होता. १२ आणि १३ सप्टेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली होती, परंतु या गोष्टीला एक महिनादेखील पूर्ण होण्याच्या आत पुन्हा त्याच ठिकाणी गोखले महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर नागरिकांनी खूप मोठ्या प्रमाणावर कचरा फेकल्याचे पाहायला मिळत आहे.



देशामध्ये "भारत स्वच्छ अभियान" राबविले जात असताना श्रीवर्धन शहराच्या प्रवेशद्वारावरतीच असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये अशा प्रकारे कचऱ्याचे ढीग का आढळून येतात? हादेखील मोठा प्रश्न आहे. या परिसरामध्ये अनेक इमारती नव्याने झालेल्या आहेत. या इमारतीमध्ये अनेक नागरिक रहायला आलेले आहेत. सदरचे नागरिक हे दिवसा कचरा टाकताना पाहायला मिळत नाहीत. रात्रीच्या वेळी आपल्या दुचाकी वरती कचऱ्याच्या बॅगा घेऊन जाऊन त्या ठिकाणी टाकण्यात येतो.

या अगोदर आराठी ग्रामपंचायत हद्दीमध्ये कचरा उचलण्यासाठी घंटागाडी सुद्धा फिरत असे, परंतु मागील काही वर्षांपासून सदरची घंटागाडी बंद पडली आहे. त्यामुळे त्या ठिकाणचे रहिवासी त्या जागी कचरा फेकत असतात.

## गणेशनगर ग्रामस्थांनी शाळेला दिला वॉटर प्युरिफायर

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील गणेशनगर येथील ग्रामस्थांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळा, गणेशनगर या शाळेला विद्यार्थ्यांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने वॉटर प्युरिफायर भेट देण्यात आला आहे.

आपल्या गावातील बालकांचे आरोग्याचा विचार करून ग्रामस्थांनी पुढाकार घेत शाळेला वॉटर प्युरिफायर उपलब्ध करून दिला. या सुविधेमुळे शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी सहज उपलब्ध होणार आहे. यामुळे ग्रामस्थांचे परिसरातून कौतुक होत आहे.

सदर प्रसंगी मुख्याध्यापक शेख मुस्तफा, शिक्षक बाळू मगर, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा रिचा शिंदे, उपाध्यक्ष हर्तिका बैकर यांच्यासह गावातील नागरिक उपस्थित होते. यावेळी ग्रामस्थांनी शाळेसाठी व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी लागणारी मदत करण्याचा प्रयत्न करू असे म्हटले.



## तळा ग्रामीण भागासह शहरात सर्वत्र नवरात्रोत्सवाची तयारी

### देवीच्या मूर्तीवर मूर्तिकारांचा फिरतोय शेवटचा हात

**तळा : प्रतिनिधी**

गणेशोत्सव साजरा झाल्यानंतर नवरात्र उत्सवाची जोरदार तयारी सुरू झाली असून मूर्तीकारांनी देवीच्या मूर्तीची रंगरंगोटी पूर्ण करून रंगकामाचा व डोळ्यांच्या आखणीच्या कामाला सुरुवात केली असून अनेक मंडळांनी मूर्तीकारांकडे दरवर्षीप्रमाणे मूर्तींची मागणी करून त्या मूर्तिकारांकडून नेण्यास आता मंडळे सज्ज झाली आहेत.



चार दिवसांनी रविवार ११ ऑक्टोबर रोजी नवरात्र उत्सव सुरू होत असून नवरात्र उत्सवाची तयारी होत असल्याचे सर्वत्र पहावयास मिळतआहे. तरुण वर्ग तर दांडीया खेळण्यासाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या दांड्या (टीपऱ्या),वेगवेगळे ड्रेस, खरेदीसाठी सरसावताना पहावयास मिळत आहेत. त्याचबरोबर नवरात्र उत्सव मंडळे सुशोभीकरण करणास तयारी करत असून वेगवेगळ्या रंगीत लाईटींग बांधण्यात येत आहेत. दांडिया खेळण्यासाठीचा मंडपांची बांधाबांध सूरू असल्याचे पहावयास मिळत आहे.

तळा तालुक्यात गावागावात ग्रामदैवताचे व देवींच्या मंदिरात नवरात्र उत्सव पारंपारिक पध्दतीने साजरा होणार आहे. त्याचबरोबर कुलदैवतांचेही घट मांडले जाणार आहेत.तालुक्यातील नवसाला पावणाऱ्या श्रीचंडीकामाता -तळा, श्रीकोंडजाईमाता - तळेगाव तर कालकाईमाता-वानस्ते या ठिकाणी नवरात्र उत्सव पारंपारिक पध्दतीने व मोठ्या आध्यात्मिक पध्दतीने उत्सव साजरा होत असतो.

या तिन्ही देवींच्या दर्शनासाठी नवरात्र उत्सवात भक्तगण भक्ती भावाने दूर दूरून येत असतात.

## नागोठणे भातगिरणी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

### १४ लाख ६४ हजारांचा नफा, सभासदांना दिवाळीपूर्वी सानुग्रह अनुदान

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे विभाग सहकारी भातगिरणी संस्था ही शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्माण झालेली संस्था असून संस्थेचे सुमारे एक हजार सभासद आहेत. संचालक मंडळाचे कुशल मार्गदर्शन आणि कर्मचारी वर्गाच्या मेहनतीमुळे संस्थेचे कामकाज प्रगतिपथावर आहे. संस्थेच्या कारभाराबाबत सभासदांमध्ये समाधान असल्याचे वार्षिक सर्वसाधारण सभेतील मोठ्या उपस्थितीवरून दिसून आले.



नागोठणे विभाग सहकारी भातगिरणी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संस्थेचया सभागृहात खेळीमेळीच्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाली. यावेळी संस्थेला यावर्षी १४ लाख ६४ हजार रुपये नफा प्राप्त झाल्याची माहिती देण्यात आली. संस्थेला ऑडिटमध्ये ‘ब’ वर्ग प्राप्त झाला असला तरी आगामी काळात संस्थेची आर्थिक व प्रशासकीय प्रगती साधून संस्थेला ‘अ’ वर्गात आणण्यासाठी संचालक मंडळ सर्वतोपरी प्रयत्न करेल, असा विश्वास सभापती सदानंद गायकर यांनी व्यक्त केला.

सभासदांना मार्गदर्शन करताना गायकर म्हणाले की, संस्थेची वाटचाल अधिक सक्षम करण्यासाठी संचालक मंडळ सातत्याने प्रयत्नशील आहे. सभासदांच्या हिताला प्राधान्य देऊन संस्थेचा कारभार अधिक पारदर्शक आणि प्रगतिशील करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

दरम्यान, संस्थेचया सभासदांसाठी महत्त्वपूर्ण घोषणा करताना कायदेशीर पूर्तता पूर्ण करून दिवाळीपूर्वी प्रत्येक सभासदाला एक हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यात येणार असल्याचे सभापती यांनी जाहीर केले. या निर्णयाचे उपस्थित सभासदांनी स्वागत करून आनंद व्यक्त केला.

या वार्षिक सर्वसाधारण सभेला सल्लागार दिलीप टके, शिवराम शिंदे, मधुकर ठमके, मारुती देवरे, कृष्णा धामणे, अनंत वाघ, ॲड. महेश पवार, लहू तेलंगे, खंडू ठाकूर, संस्थेचे सचिव अनिल पवार यांच्यासह संचालक मंडळाचे सदस्य तसेच शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या माध्यमातून संस्थेच्या आगामी वाटचालीबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून संस्थेला ‘अ’ वर्ग मिळवून देण्याच्या सभापतींच्या निर्धाराचे सभासदांनी स्वागत केले.

## बीईएस इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये स्वच्छता अभियान




**नागोठणे : बातमीदार**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त बी.ई.एस. इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, वेलशेत, नागोठणे येथे शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर रोजी स्वच्छता अभियान उत्साहात व उत्स्फूर्त सहभागाने राबविण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. यावेळी महात्मा गांधी यांनी दिलेल्या स्वच्छता, शिस्त, स्वावलंबन आणि सामाजिक बांधिलकीच्या विचारांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.या उपक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर जैन आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिक जैन यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी संस्थेचे प्राचार्य डॉ. आशिष पगारिया यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले. स्वच्छता अभियानाचे समन्वयन श्रीमती अश्विनी पाटील यांनी केले.

या अभियानात बी.ई.एस. इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमधील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी एकत्रितपणे संस्थेच्या परिसरातील विविध भागांची स्वच्छता करून कचरा संकलित केला.यावेळी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन तसेच प्लास्टिकमुक्त परिसर याबाबत जनजागृती करण्यात आली. “स्वच्छता हीच सेवा”, “स्वच्छ परिसर सुंदर परिसर” आणि “स्वच्छ भारत, निरोगी भारत” अशा संदेशांद्वारे विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित केले.

## अनिल चौधरी यांचा सत्कार

**नागोठणे : बातमीदार**

विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देत ३४ वर्षे शैक्षणिक क्षेत्रात ज्ञानसेवा बजावणारे, विविध पुरस्कारांनी सन्मानित जळगाव जिल्ह्याच्या अमळनेर तालुक्यातील निंब येथील नंदादीप माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल चौधरी यांचा नागोठणे शहर व विभाग नाभिक समाजातर्फे मार्गदर्शक दिलीप टके यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला.

नाभिक संघांचे सल्लागार शामकांत नेरपगार, हरीश टके, रवींद्र टके, दिगंबर खराडे, नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार संघाचे अध्यक्ष ॲड. महेश पवार, महेंद्र पवार, जगदीश दिवेकर, चेतन टके, अमित मोरे यांच्यासह नाभिक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रायगड आंचल कार्यालयात हिंदी महिना उत्साहात साजरा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राजभाषा हिंदीचा प्रसार आणि प्रचार करण्यासोबतच कार्यालयीन कामांमध्ये तिचा सहज आणि शंभर टक्के वापर वाढवण्याच्या उद्देशाने बँक ऑफ इंडियाच्या रायगड आंचल कार्यालयाद्वारे सप्टेंबर महिन्यात विविध सर्जनशील आणि स्पर्धात्मक कार्यक्रमांच्या मालिकेद्वारे हिंदी महिना मोठ्या सन्मानाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात आंचल व्यवस्थापक दीपन्विता सहानी आणि उप आंचल व्यवस्थापक भरत सहाय यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली आणि प्रमुख उपस्थितीत झाली.

उद्घाटन सत्रादरम्यान हिंदी दिवस का साजरा केला जातो या विषयावर एका अर्थपूर्ण चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षीय भाषणात आंचल व्यवस्थापक दीपन्विता सहानी यांनी दैनंदिन बँकिंग, पत्रव्यवहार आणि प्रशासकीय कामांमध्ये राजभाषेचा जास्तीत जास्त वापर करण्यावर भर दिला. त्या म्हणाल्या की, हिंदी ही केवळ आपली राजभाषा नसून ग्राहकांशी जोडले जाण्याचे आणि तळागाळातील लोकांपर्यंत बँकिंग सेवा पोहचवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. तर उपआंचल व्यवस्थापक भरत सहाय यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आयोजित विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचे आवाहन केले.

कर्मचाऱ्यांसाठी विविध ज्ञानवर्धक स्पर्धांची मालिका आयोजित करण्यात आली होती. राजभाषा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी आणि कर्मचाऱ्यांची भाषिक कौशल्ये वाढवण्याच्या उद्देशाने संपूर्ण सप्टेंबर महिन्यात अनेक मनोरंजक स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यालयीन संवादात पारदर्शकता आणण्यासाठी आणि राजभाषा धोरणाचे पालन करण्यासाठी सर्व विभागांसाठी हिंदीमध्ये ई-मेल पाठवणे अनिवार्य करण्यात आले होते. बँक अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी हिंदी टिपणी, मसुदा लेखन आणि दैनंदिन बँकिंग शब्दसंग्रहावर आधारित बहुपर्यायी प्रश्न स्पर्धा आयोजित करण्यात आली. विविध बँकिंग उत्पादनांच्या हिंदी जाहिराती तयार करणे, आकर्षक पोस्टर बनवणे तसेच महान विचारवंत आणि कवींचे हिंदीविषयीचे विचार प्रदर्शित करण्यासाठी पोस्टर व विचार लेखन स्पर्धा आयोजित केली गेली.

## भातशेती बहरली!



**मुरूड :** राज्याच्या काही भागात कमी पर्जन्यमानामुळे दुष्काळी परिस्थिती असताना कोकणातील रायगड जिल्ह्यात समाधानकारक पाऊस पडला असल्याने कृषी क्षेत्रात चांगली स्थिती आहे. सध्या भातपीक तरारून आले असून त्याचे सुधीर नाझरे यांनी टिपलेले सुंदरसे छायाचित्र.

# पहिल्या टी-२०मध्ये भारत विजयी

**लखनऊ : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेमधील पहिला सामना लखनौच्या इकाना स्टेडियममध्ये पार पडला. या सामन्यात नाणेफेकीचा कौल भारताने जिंकला आणि वेस्ट इंडिजच्या वाटेला प्रथम फलंदाजी आली. वेस्ट इंडिजने १९.१ षटकात सर्व गडी गमवून १७१ धावा केल्या आणि भारतासमोर विजयासाठी १७२ धावांचे आव्हान ठेवले. हे आव्हान भारताने १४.२ षटकात दोन गडी गमवून सहज गाठले.



वेस्ट इंडिजने विजयासाठी दिलेल्या धावांचा पाठलाग करताना भारताची सुरुवात डळमळीत झाली. अभिषेक शर्मा २१ धावा करून बाद झाला. तेव्हा भारताची धावसंख्या २९ होती. त्याच्या पाठोपाठ संजू सॅमसनची विकेट पडली. भारताला ३५ धावा असताना दोन धक्के बसले, पण त्यानंतर इशान किशन आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी विजयी भागीदारी केली. या दोघांनी मिळून तिसऱ्या विकेटसाठी ६७ चेंडूत नाबाद १३७ धावा केल्या. यात श्रेयसने ४३ चेंडूत १०२ धावांची खेळी केली, तर इशानने २७ चेंडूत नाबाद ३७ धावा केल्या.

तत्पूर्वी वेस्ट इंडिजच्या डावाची सुरुवातही डळमळीत झाली होती. या सामन्यातून टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण करणारा ओपनर कामिल पूरन १२ धावांवर बाद झाला, तर शिमरॉन हेटमायर पाच आणि रोवमन पॉवेल खातेही खोलू शकला नाही, मात्र दुसऱ्या बाजूने कर्णधार सलामीवीर आणि यष्टिरक्षक शाय होप याने डावाची धुरा सांभाळत ३७ चेंडूंत सहा चौकार आणि दोन षटकारांसह ५२ धावांची खेळी केली. त्याला मधल्या फळीतील शेरफेन रदरफोर्डची उत्तम साथ मिळाली. त्याने आक्रमक फलंदाजी करत अवघ्या ३४ चेंडूंत ५६ धावा कुटल्या. या दोघांशिवाय इतर कोणत्याही फलंदाजाला मोठी धावसंख्या उभारता आली नाही. वेस्ट इंडिजला आठ धावा अतिरिक्त मिळाल्या.

भारताने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-०ने आघाडी घेतली आहे. विजयासह श्रेयस अय्यरच्या नावावर एक विक्रमही रचला गेला आहे. श्रेयसच्या नेतृत्वात भारताचा हा सलग दहावा विजय आहे. यासह त्याने विराट कोहली आणि सूर्यकुमार यादव यांना मागे टाकले आहे.

### श्रेयस अय्यरचे विक्रमी शतक

वेस्ट इंडिजने विजयासाठी दिलेल्या धावांचा पाठलाग करताना भारताचा कर्णधार श्रेयस अय्यर याने शतकी खेळी केली. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये धावांचा पाठलाग करताना शतक झळकावणारा श्रेयस हा भारताचा पहिला आणि एकमेव कर्णधार ठरला आहे. यापूर्वी भारतीय कर्णधारातर्फे धावांचा पाठलाग करताना सर्वोच्च धावसंख्या विराट कोहलीच्या नावावर होती. त्याने २०१९मध्ये हैदराबाद येथे वेस्ट इंडिजविरुद्धच नाबाद ९४ धावा केल्या होत्या. आता विक्रम श्रेयसच्या नावावर नोंदवला गेला आहे, तर वेस्ट इंडिजविरुद्ध आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये शतक झळकावणारा तो तिसरा भारतीय फलंदाज ठरला आहे.

रोहित शर्मानंतर सलग दहा टी-२० सामने जिंकणारा श्रेयस दुसरा कर्णधार ठरला आहे.

# 'सीकेटी'च्या निकिताला बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

धारावी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स सायन येथे झालेल्या मुंबई विभागीय शालेय १९ वर्षाखालील मुलींच्या बॉक्सिंग स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील निकिता राजेश नाईक (इ.१२वी) हिने सुवर्णपदक जिंकले. तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत ठाणे जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये निकिताने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# स्मृती मंधाना महिला संघाची कर्णधार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार खेळाडू आणि माजी विश्वचषक विजेती कर्णधार हरमनप्रीत कौरने कर्णधारपद सोडले आहे. तिच्यानंतर भारतीय महिला क्रिकेट संघाला नवीन कर्णधार मिळाली आहे. आतापासून स्मृती मंधाना देशाच्या महिला संघाचे नेतृत्व करणार आहे.

२०१३पासून भारतीय संघाचा भाग असलेल्या स्मृतीला भारतीय महिला क्रिकेट संघामध्ये खेळण्याचा दांडगा अनुभव आहे. संघ एका नवीन टप्प्यात प्रवेश करत असून गेल्या काही वर्षांत केलेल्या प्रगतीवर पुढे वाटचाल करत असताना आता स्मृती संघाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी स्वीकारेल.

## आयपीएलमध्ये दिल्लीच्या प्रशिक्षकपदी सौरव गांगुली

**नवी दिल्ली** : भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली याची आयपीएल २०२७ हंगामासाठी दिल्ली कॅपिटल्सच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दिल्ली कॅपिटल्ससोबत अनेक वर्षे विविध जबाबदाऱ्या सांभाळल्यानंतर आता प्रथमच गांगुली मुख्य प्रशिक्षकाच्या भूमिकेत दिसणार आहे. हेमांग बदानीच्या जागी ५४ वर्षीय गांगुली नव्या पर्वात नव्या इनिंगची सुरुवात करेल.

# वेस्ट झोन नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये श्रेया बांदलला सुवर्णपदक

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील पाटणूस ग्रामपंचायत हद्दीतील भैरिची वाडी येथील श्रेया बांदल हिने ॲथलेटिक्स क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. गोवा येथे नुकत्याच झालेल्या वेस्ट झोन नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये अडथळा शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावत तिने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

INDIAN ATHLETICS

श्रेया हिने दुसरीत असतानाच शाळेतील धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत धावण्याच्या क्षेत्रात पाऊल ठेवले. तिचे वडील लहानपणापासूनच क्रीडाप्रेमी होते, मात्र प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांना स्वतःचे क्रीडा क्षेत्रातील स्वप्न पूर्ण करता आले नाही. त्यामुळे आपल्या मुलीने खेळाच्या क्षेत्रात मोठी कामगिरी करावी, असा निर्धार त्यांनी केला आणि श्रेयाला ॲथलेटिक्ससाठी सातत्याने प्रोत्साहन दिले.

श्रेया सध्या ऐरोली येथील श्रीमती राधाबाई मेघे विद्यालयात दहावीच्या वर्गात शिक्षण घेत असून प्रशिक्षक राज सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे.

# एमएनएम विद्यालयातील विद्यार्थ्यांचे कराटे स्पर्धेत दमदार यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुकास्तरीय डीएसओ कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन पनवेलजवळील सुकापूर येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत एमएनएम विद्यालय व टीएनजी कनिष्ठ विज्ञान विद्यालय, गव्हाण-कोपर येथील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.




१४ वर्षांखालील मुलांच्या गटात अतुल कोरडे आणि नील नितीन पाटील यांनी दमदार खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. १७ वर्षांखालील मुलींच्या गटात सांज प्रवीण नाईक हिने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले. मुलांमध्ये दीक्षांत शरद उबाळे याने रौप्यपदक मिळवले. १९ वर्षांखालील मुलींच्या गटात जिविका सत्यवान पाटील हिने सुवर्णपदकावर नाव कोरले. या सर्वांना कराटे प्रशिक्षक परेश पावसकर यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल प्राचार्य सायली वडवलकर, पर्यवेक्षक अरुण जोशी व प्रणिता गोळे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कामगिरीमुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात आणखी भर पडली आहे.

# श्लोक माळीला विभागीय तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक

## राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड; शाळेकडून कौतुक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वसई येथे आयोजित विभागीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत रसायनीतील पिल्लई एचओसीएल स्कूलचा विद्यार्थी श्लोक सचिन माळी याने दमदार कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर अकोला येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.



विभागीय स्पर्धेत पिल्लई एचओसीएल स्कूलच्या एकूण पाच विद्यार्थ्यांनी पदके मिळवत शाळेच्या नावलौकिकात भर घातली. श्लोक माळीने सुवर्णपदक मिळविले. आराध्य कदम याने रौप्यपदकाला गवसणी घातली, तर दीप कोंडीलकर, मयुरेश माने आणि ऐश्वर्या राठोड यांनी कांस्यपदक मिळवले. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक तथा तायक्वांदो प्रशिक्षक सचिन माळी यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका रिमा निकाळजे, मॅनेजमेंट प्रतिनिधी आर.बी. पाटील आणि स्पोर्ट्स डायरेक्टर पद्माक्षण यांनी अभिनंदन केले तसेच श्लोकच्या राज्यस्तरीय निवडीबद्दल कौतुक करून त्याला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# विभागीय कुस्ती स्पर्धेत 'सीकेटी'च्या विद्यार्थिनींची चमक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत ठाणे जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कारमेल स्कूल खोपोली येथे झालेल्या मुंबई विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींनी यश मिळविले.

महिमा महाडिक आणि दक्षता रीसबुड (इ.१२वी) या विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक, तर किर्ती घोलप (इ.११वी) हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी मालिका भारताने जिंकली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडिया अंडर-१९ क्रिकेट संघाने ऑस्ट्रेलिया अंडर-१९ संघाचा दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात १० विकेट्सने पराभव केला. डावखुरा ऑर्थोडॉक्स फिरकीपटू तन्मय बलोडाच्या शानदार गोलंदाजीच्या (१४ विकेट्स) जोरावर भारताने दुसरा कसोटी सामना अवघ्या पाच चेंडूत संपवत मालिका २-० अशी खिशात घातली.



दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात १७४ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने पहिल्या डावात ३१५ धावा करत १४१ धावांची आघाडी मिळवली. त्यानंतर ऑस्ट्रेलियाचा संघ दुसऱ्या डावात १५१ धावांवर गारद झाला. त्यामुळे भारतासमोर विजयासाठी अवघ्या ११ धावांचे लक्ष्य ठेवण्यात आले. भारताने दुसऱ्या डावात एकही विकेट न गमावता पाच चेंडूत ११ धावा करत सामन्यासह मालिका जिंकली.

भारताने पहिली कसोटी एक डाव आणि ४८ धावांनी जिंकली होती. याआधी भारताने ऑस्ट्रेलियाला तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतही ३-० असे क्लीन स्वीप केले होते.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com